# वार्षिक अहवाल

## वरिष्ठ महाविद्यालय

## विद्यार्थी मंडळ :

**अध्यक्ष : प्रा. राहुल वाघमारे**

महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार व पुणे विद्यापीठाच्या नियमानुसार दिनांक १४/०९/२०१३ रोजी दुपारी ४.३० वाजता विद्यार्थी मंडळाची निवडणूक प्रक्रीया पार पाडण्यात आली. बी.ए. / बी. कॉम. / बी.एस्सी. / बी.बी.ए. / बी.सी.ए. / बी.सी. एस. / एम. ए. / एम. कॉम. / एम. एस्सी. / या शाखांमधून वर्गप्रतिनिधींची निवड करण्यात आली. विद्यापीठ प्रतिनीधी म्हणून कु. मंडलिक प्रियंका भास्कर एस.वाय.बी.सी.ए. हिची बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच एन.सी.सी. प्रतिनिधी म्हणून वाकचौरे अविनाश रामदास (एफ.वाय.बी.कॉम.), एन.एस.एस. प्रतिनिधी म्हणून संगारे शंकर विश्वनाथ (एस.वाय.बी.ए.) कु. आयेशा सय्यद इम्रान (एस.वाय.बी.ए.), कला मंडळ प्रतिनीधी म्हणून कु. वघेल पूजा कच्छेदी (टी.वाय.बी.सी.ए.), क्रिडा प्रतिनीधी म्हणून शेख तौफीक आरिफ, विद्यार्थी प्रतिनीधी म्हणून कु. आढाव शितल गोरक्षनाथ (एफ.वा.बी.ए.), विद्यार्थीनी प्रतिनिधी म्हणून कु. भांगरे फसाबाई चिंधु (टि.वाय.बी.ए.) या सर्वांची निवड मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत करण्यात आली. शनिवार दि. २८/०९/२०१३ रोजी विद्यार्थी मंडळाचे उद्घाटन व शपथ विधी समारंभ मा. ना. मधुकररावजी पिचड साहेब (आदिवासी विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य व कार्यकारी विश्वस्त, अ.ता.ए.सो. अकोले) यांच्या शुभ-हस्ते पार पडला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मा. ॲड. प्रेमानंदजी रुपवते (विश्वस्त, अ.ता.ए.सो. अकोले) यांनी भुषविले. वर्षभरात मंडळामार्फत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. दि. २०/०१/२०१४ रोजी टाय डे व सारी डे, दि. २१/०१/२०१४ रोजी ट्विन्स डे, दि. २२/०१/२०१४ रोजी व्हाईट डे , दि. २३/०१/२०१४ रोजी सायकल डे, दि. २४/०१/२०१४ रोजी मिसमॅच डे, दि. २५/०१/२०१४ रोजी कॅप डे, व २६/०१/२०१४ रोजी ट्रॅडीशनल डे साजरे करण्यात आले. दि. १८/०१/२०१४ रोजी महाविद्यालयातील विद्यापीठ प्रतिनिधी व वर्गप्रतिनीधींमार्फत ॲटाक्झीया आजाराने ग्रस्त माजी विद्यार्थी व विद्यार्थीनी ह.भ.प. सचिन देशमुख व बहीन पुनम देशमुख यांना रु. ६,११५ /- देऊन सामाजीक बांधीलकी जपली.

संपूर्ण वर्षभरात शिस्तबद्ध पद्धतीत विद्यापिठातील विविध उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर टाकली. विद्यार्थी मंडळाच्या वर्षभराच्या कार्यभारात एन.एस.एस. चे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बी. एस. देशमुख, विद्यार्थी कल्याण अधिकारी प्रा. डॉ. ए. एम. दातीर (एन.सी.सी.प्रमुख), प्रा. एस.ए.पाळंदे (क्रीडा संचालक), प्रा. डॉ. राहूल भोसले (कला मंडळ प्रमुख), प्रा. एस.जी. घनकुटे तसेच प्रा. बाळासाहेब मेहेत्रे , प्रा. के.बी. नाईकवाडी, प्रा. भानुदास खताळ व स्टाफ सेक्रेटरी प्रा. डॉ. रंजना कदम यांचे सहकार्य लाभले. वर्षभरात महाविद्यालयाचे प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

## क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग :

**शारीरीक शिक्षण संचालक**

**प्रा. डॉ. राहूल रा. भोसले**

सन २०१३ - १४ या शैक्षणिक वर्षात विविध खेळांचे संघ तयार करून आंतरविद्यापीठ, आंतरविभागीय, आंतरमहाविद्यालयीन तसेच राज्य स्तरीय स्पर्धेसाठी पाठविण्यात आले.

**क्रिकेट** : आंतरमहाविद्यालयीन क्रिकेट स्पर्धा राहुरी इंजिनीअरींग कॉलेज, राहुरी येथे ३१ ऑगस्ट २०१३ रोजी पार पडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचा संघ सहभागी झाला होता. संघाचा कप्तान 'परदेशी हेमंत विजय' याने नेतृत्व केले.

**बॅडमिंटन** : आंतरमहाविद्यालयीन बॅडमिटन स्पर्धा अहमदनगर कॉलेज, अहमदनगर येथे दि. १४ सप्टेंबर २०१३ रोजी पार पाडल्या. या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाचा संघ सहभागी झाला. यामध्ये ५ मुलांची निवड करण्यात आली. संघाचा कप्तान म्हणून 'जाधव अनिकेत सुरेश' याने नेतृत्व केले.

**हॅण्डबॉल (मुली)** : आंतरमहाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धा संजीवनी कॉलेज, कोपरगाव येथे दि. ४ सप्टेंबर २०१३ रोजी पार पाडल्या. या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या संघाने विजेते पद पटकावले. या संघात एकूण १२ मुली सहभागी झाल्या होत्या. कप्तान म्हणून 'नवले रोशनी राजेंद्र' हिने नेतृत्व केले. तसेच अहमदनगर विभागातर्फे पुणे विभागीय स्पर्धेसाठी एकूण सात खेळाडूंची निवड झाली. आंतरविभागीय हॅन्डबॉल स्पर्धा आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, नांदगाव येथे दि. २० व २१ ऑक्टोबर याकालावधीत पार पडल्या. या स्पर्धेतून 'कु. सावंत सुश्मिता लहानु' या विद्यार्थीनीची पुणे विद्यापीठाच्या संघात वेस्ट झोन व ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी स्पर्धेसाठी निवड झाली. या स्पर्धा राजस्थान विद्यापीठ, जयपूर येथे २२ ते २५ डिसेंबर रोजी पार पडल्या. त्यामध्ये पुणे विद्यापीठ संघाने वेस्ट झोन स्पर्धेत

विजय संपादन केला. व हा संघ ऑल इंडिया स्पर्धेसाठी पात्र ठरला.

**हॅण्डबॉल (मुले)** : आंतरमहाविद्यालयीन हॅण्डबॉल स्पर्धा संजिवनी कॉलेज, कोपरगाव येथे दि.५ सप्टेंबर २०१३ रोजी पार पाडल्या. या स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या संघाने विजेते पद पटकाविले. या संघात एकूण १२ मुले सहभागी झाले होते. कप्तान म्हणून 'परदेशी हेमंत विजय' याने नेतृत्व केले. तसेच अहमदनगर विभागातर्फे पुणे विभागीय हॅण्डबॉल स्पर्धेसाठी एकूण सात खेळाडूंची निवड झाली. आंतरविभागीय हॅण्डबॉल स्पर्धा श्री शिवछत्रपती कॉलेज, जुन्नर येथे दि. १२ व १३ नोव्हेंबर २०१३ रोजी पार पाडल्या. या स्पर्धेतून 'पांडे गणेश विजय' या विद्यार्थ्याचे पुणे विद्यापीठाच्या संघात वेस्ट झोन व ऑल इंडिया इंटर युनिव्हरसीटी स्पर्धेसाठी निवड झाली. या स्पर्धा राजस्थान विद्यापीठ, जयपूर येथे २२ ते २५ डिसेंबर २०१३ रोजी पार पडल्या. त्यामध्ये पुणे विद्यापीठाने वेस्ट झोन स्पर्धेत विजय संपादन करून ऑल इंडिया स्पर्धेसाठी पात्र ठरले.

**नेटबॉल (मुले)** : आंतरविभागीय नेटबॉल स्पर्धा अहमदनगर कॉलेज, अहमदनगर येथे दि.१४ डिसेंबर २०१३ रोजी पार पडल्या. या संघात एकूण ११ मुलांची निवड करण्यात आली. संघाचा कप्तान म्हणून 'घोलप अजिक्य यादव' याने नेतृत्व केले. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेतून आपल्या महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची निवड विभागीय स्पर्धेसाठी अहमदनगर संघात झाली. या स्पर्धा आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज, येवला येथे २० व २१ डिसेंबर रोजी पार पाडल्या.

**नेटबॉल (मुली)** : आंतरविभागीय नेटबॉल स्पर्धा अहमदनगर कॉलेज, अहमदनगर येथे दि.१५ डिसेंबर २०१३ रोजी पार पडल्या. या संघात एकूण १० विद्यार्थीनींची निवड करण्यात आली. आंतरमहाविद्यालयीन स्पर्धेतून आपल्या महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची निवड विभागीय स्पर्धेसाठी अहमदनगर संघात झाली. या स्पर्धा आर्टस, कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉजेल चाकण येथे दि. २५ व २६ डिसेंबर २०१३ रोजी पार पडल्या.

**वार्षिक क्रीडा स्पर्धा** : सालाबाद प्रमाणे याही वर्षी वार्षिक क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. क्रीडा विभागाचे कामकाज करीत असताना वर्षभरात महाविद्यालयाचे प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, उपप्राचार्य आत्माराम काळे, पर्यवेक्षक प्रा. जी.के. हासे, क्रीडा विभाग समिती सदस्य, सर्व प्राध्यापक वर्ग व महाविद्यालयीन कर्मचारी वर्ग यांचे विशेष सहकार्य लाभले. तसेच गावातील अनेक सेवाभावी संस्था, व्यक्ती यांनी वेळोवळी सहकार्य केले. या सर्वांचा क्रीडा विभाग ऋणी राहील.

## राष्ट्रीय छात्र सेना :

**प्रा. एस.ए.पाळंदे**

राष्ट्रीय छात्र सेनचे एकता और अनुशासन हे ध्येय असून युवकांमध्ये आत्मविश्वास आणि निस्वार्थ सेवाभावाचा संचार करणे हा उद्देश आहे.

**छात्रांची नियुक्ती / नेमणूक** : २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात U/O पदासाठी बिन्नर विलास याची नियुक्ती करण्यात आली. तसेच विद्यार्थी मंडळाचा NCC प्रतिनीधी म्हणून Cpl. वाकचौरे अविनाश याची निवड करण्यात आली.

**२६/११ तील शहीदांना श्रद्धांजली** : स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन या दिवशी २६/११ ला अतिरेक्यांशी लढताना शहीद झालेले अधिकार तसेच सैनिक यांना संस्थेचे अध्यक्ष मा. जे.डी. आंबरे पाटील यांनी श्रद्धांजली वाहून स्मारकास पुष्पचक्र अर्पण केले.

**राष्ट्रीय उत्सव** : स्वातंत्र्यदिन व प्रजासत्ताक दिन या दिवशी मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

**नॅशनल इंटिग्रेशन कॅम्प (NIC)** : दि. ११ मे २०१३ ते २२ मे २०१३ या कालावधीत सातारा येथे सदर NIC कॅम्पमध्ये सार्जंट खैरनार शिवाजी या छात्राची निवड करण्यात आली.

**नॅशनल इंटिग्रेशन कॅम्प (NIC)** : हा कॅम्प दि. १५ डिसेंबर २०१३ ते ३० डिसेंबर २०१३ येथे भारतीय सैन्या तर्फे घेण्यात आला. यात आपल्या महाविद्यालयातील U/O बिन्नर विलास याची निवड झाली.

(Mountaineering) : या कॅम्पसाठी सार्जंट कातोरे अभिजीत याची निवड करण्यात आली. या छात्राने जम्मु आणि काश्मीर येथे झालेल्या कॅम्प मध्ये दि. ५ जुलै ते २६ जुलै २०१३ या कालावधीत महाविद्यालयाचे प्रतिनीधत्व केले. व कोर्स यशस्वी रित्या पूर्ण केला.

**आर्मी अ‍ॅटॅचमेंट कॅम्प** : दि. ११ स्पटेंबर ते २५ सप्टेंबर २०१३ या कालावधीत अहमदनगर येथे झालेल्या या कॅम्पमध्ये कॅडेट जाधव ए.एस. आणि सार्जंट वाकचौरे मयुर यांनी सहभाग घेतला होता.

**ग्रृप सिलेक्शन कॅम्प औरंगाबाद** : औरंगाबाद येथे घेतलेल्या या कॅम्प मध्ये आपल्या महाविद्यालयातील चार छात्र सहभागी झाले होते.

**अ‍ॅन्युअल ट्रेनिंग कॅम्प** : हा कॅम्प २९ जुलै ते ८ ऑगस्ट २०१३

या कालावधीत घेण्यात आला. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचे ५ छात्र सहभागी झाले होते.

**ॲन्युअल ट्रेनिंग कॅम्प** : हा कॅम्प ३० ऑगस्ट ते ८ स्पटेंबर २०१३ या कालावधीत अहमदनगर येथे घेण्यात आला. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचे ९ छात्र सहभागी झाले होते.

**(ATC) कॅम्प** : दिनांक ९ डिसेंबर ते ११डिसेंबर २०१३ या कालावधीत औरंगाबाद येथे घेण्यात आला. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचे ६ छात्र सहभागी झाले होते.

**(ATC) कॅम्प** : दिनांक १९ डिसेंबर ते २८ डिसेंबर २०१३ या कालावधीत औरंगाबाद येथे घेण्यात आला. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचे ९ छात्र सहभागी झाले होते.

**(NCC) डे** : प्रतिवर्षी राष्ट्रीय छात्र सेनेचा स्थापना दिन नोव्हेंबर महिन्याच्या चौथ्या आठवड्यात साजरा केला जातो.

**गार्ड ऑफ ऑनर** : दिनांक २८ स्पटेंबर २०१३ रोजी विद्यार्थी मंडळाच्या उदघाटन प्रसंगी राज्याचे आदिवासी विकास मंत्री व अ.ता.ए.सोसा.चे कार्यकारी विश्वस्त ना. मधुकरराव पिचड यांचे आगमन झाले. यावेळी ना. पिचड साहेबांना सन्मान पूर्वक गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला.

**B आणि C प्रमाणपत्र परीक्षा** : २०१३ -१४ या शैक्षणिक वर्षात १० छात्र B प्रमाणपत्र परीक्षा प्रात्र झाले . तसेच १४ छात्र C प्रमाणपत्रास पात्र झाले.

**कर्नल भेट** : दिनांक २३ जानेवारी २०१४ रोजी कर्नल पी.एस. देशपांडे, कमांडीग ऑफीसर ५७,Bn, NCC अहमदनगर यांनी महाविद्यालयास भेट दिली व सर्व NCC च्या सर्व छात्रांचे कौतुक केले.

## राष्ट्रीय सेवा योजना :

**प्रा. डॉ. बी.एस. देशमुख**
**कार्यक्रम अधिकारी**

'खरा भारत देश खेड्यांचा आहे, म्हणून खेड्यातील जनतेला स्वातंत्र्याची सर्व फळे उपभोगता आली पाहिजेत' असे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी म्हटले होते. महाविद्यालयाच्या कार्याची व विकासाची नाळ अशाच काही खेड्यांशी जोडलेली आहे. खेड्यांमधून आलेल्या प्रत्येक महाविद्यालयीन युवकांच्या सर्वांगीण विकासाठी ही योजना कार्य करते.

'माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी' या राष्ट्रीय सेवा योजनेच्या बोधवाक्याप्रमाणे स्वावलंबी व चारित्र्यवर्धक युवक निर्माण करणे, युवकांमध्ये नेतृत्वगुण विकसित करणे यासारख्या उद्देशांनी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सन २०१३-१४ मध्ये कामकाज सुरू झाले.

**स्वयंसेवक प्रवेश** : सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात पुणे विद्यापीठाच्या मान्यतेनुसार २५० विद्यार्थी / विद्यार्थीनींना (स्वयंसेवकांना) प्रवेश देण्यात आला.

**नेमणूक**: कार्यक्रम अधिकारी म्हणून प्रा. डॉ. बाबासाहेब देशमुख तर सहकार्यक्रम अधिकारी म्हणून प्राध्यापिका सौ. महेजबीन सय्यद व प्रा. भानुदास खताळ यांची नेमणूक करण्यात आली. विद्यार्थी प्रतिनीधी श्री. शंकर संगारे व विद्यार्थीनी प्रतिनीधी कु. आयेशा सय्यद हिची निवड करण्यात आली.

**उद्घाटन** : राष्ट्रीय सेवा योजनेच्या नियमित कार्यक्रमाचे उद्घाटन दि. १४/०८/२०१३ रोजी संस्थेचे अध्यक्ष जे.डी. आंबरे पाटील यांचे अध्यक्षतेखाली झाले. प्रमुख पाहुणे म्हणून पुणे विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे जिल्हा समन्वयक प्रा. आर. जी. कोल्हे यांनी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

**नियमित कार्यक्रम** :

१) विद्यार्थी मार्गदर्शन मेळावा : दि. १० ऑगस्ट २०१३ रोजी विद्यार्थी स्वयंसेवक मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

२) वृक्षारोपण : दि. १० ऑगस्ट २०१३ रोजी महाविद्यालय परिसरात विविध प्रकारच्या ५० झाडांची लागवड करण्यात आली.

३) पर्यावरण दिंडी : दि. १८ सप्टेंबर २०१३ पर्यावरण दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. त्यात महाविद्यालयाच्या २०० स्वयंसेवकांनी सहभाग घेतला.

४) गणेश मूर्ति विसर्जन : राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने गणेश मूर्ति विसर्जन दि. १८ सप्टेंबर २०१३ रोजी १८८५ गणेश मूर्तिंचे विसरर्जन करण्यात आले व निर्माल्य दान घेण्यात आले. या वेळी अकोल्याचे तहसिलदार मा. चंद्रशेखर देशमुख तसेच पो. नि. मा. उत्तमराव शेळके साहेब व महाविद्यालयाचे प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, प्राध्यापक , शासकीय कर्मचारी व ग्रामपंचायत अकोले यांनी स्वयंसेवकांना सहकार्य केले.

५) एन.एन.एस.डे.: दि. २८ सप्टेंबर २०१३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना दिवस आयोजित करण्यात आला. या दिवशी मा. प्राचार्यांनी 'आजचा युवक व आव्हाने' या विषयावर स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

६) श्रमदान : दि. २७ सप्टेंबर २०१३ रोजी महाविद्यालय व परिसरात श्रमदान करण्यात आले.

७) मतदार नोंदणी : महाराष्ट्र शासन व मा. तहसिलदार अकोले

यांचे आवाहनानुसार राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांमार्फत २००० महाविद्यालयीन युवकांची नव्याने मतदार म्हणून नोंदणी करण्यात आली.

८) हटके उपक्रम : राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि. २१ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या 'एक हटके' उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमात नर्बदा सरोवर प्रकल्पग्रस्त आदिवासी विद्यार्थी व शिक्षक यांचेसाठी अकोले शहरातून वापरण्या योग्य कपडे, भांडे व गृहपयोगी वस्तू फर्निचर या सारखी मदत गोळा करण्यात आली. या योजनेत प्रचंड प्रतिसाद मिळाला. दि. ३१ ऑक्टोबर २०१३ रोजी एक टेम्पो भरून या सर्व वस्तू धडगाव (जिल्हा नंदुरबार) या ठीकाणी दिवाळीची सप्रेम भेट म्हणून अकोले पंचायत समितीच्या सभापती श्रीमती अंजनाताई बोंबले, संस्थेचे विस्तारप्रमुख मा. मिनानाथ पांडे, नर्मदा बचाव अंदोलनाच्या कार्यकत्या लतीका रचपूत यांचे उपस्थितीत हा टेम्पो रवाना करण्यात आला. अशा प्रकारे राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी एक वेगळ्या प्रकारची दिवाळी साजरी केली.

९) रस्ता सुरक्षा अभियान :दिनांक ११ जानेवारी २०१४ रोजी रस्ता सुरक्षा अभियान शपथ ग्रहण समारंभाचे आयोजन करण्यात आले. त्यात १५० विद्यार्थ्यांनी शपथ घेतली.

१०) एड्स जन-जागृती :जागतिक एडस् दिन १ डिसेंबर २०१३ रोजी प्रोस्टर प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले.

**विद्यार्थी सहभाग :** १) दि. २० ते २६ मे २०१३ व दि. २७ मे ते २ जून २०१३ रोजी खडकवासला येथे झालेल्या राज्यस्तरीय श्रम संस्कार शिबिरात १३ स्वयंसेवक सहभागी झाले होते.

२) दि. २ ते ११ जून २०१३ रोजी नांदेड येथे झालेल्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन शिबीरात २ स्वयंसेवक सहभागी झाले होते.

३) राज्यस्तरीय पुणे ते पंढरपूर हरीतउर्जा, तसेच कन्यारत्न अभियान दिंडीत ४ स्वयंसेवक सहभागी झाले होते.

४)यशवंत सामाजिक प्रतिष्ठाण सोनई येथील दि. ६ ऑगस्ट २०१३ रोजी पुणे विद्यापीठ भेट उपक्रमात ५ विद्यार्थी व ५ विद्यार्थीनींनी सहभाग घेतला होता.

५) दि. २३ व २४ ऑगस्ट २०१३ रोजी संगमनेर येथे झालेल्या जिल्हा स्तरीय कार्यशाळेत २ विद्यार्थी सहभागी झाले होते.

६) राज्य स्तरीय प्रजासत्ताक दिनी, दि. २१ सप्टेंबर २०१३ रोजी औरंगाबाद येथे झालेल्या संचलन शिबिरात श्री. पोपेरे गोरक्षनाथ पुंजा या विद्यार्थ्याचा सहभाग.

७) दि. ३ डिसेंबर २०१३ रोजी पारनेर येथे झालेल्या जिल्हास्तरीय कार्यशाळेत ८ स्वयंसेवकांचा सहभाग.

८) दि. २७ डिसेंबर २०१३ रोजी मॉडर्न कॉलेज ऑफ फार्मसी निगडी पुणे येथे झालेल्या विद्यापीठ स्तरीय मूल्यशिक्षण कार्यशाळेत २ विद्यार्थी सहभागी.

९) एम.आय.टी. कॉलेज, पुणे दि. १० ते १२ जानेवारी २०१४ रोजी झालेल्या राष्ट्रीय विद्यार्थी परिषदेत २ स्वयंसेवक सहभागी.

१०) रामकृष्ण मोरे कॉलेज, आकुर्डी (पुणे) येथे दि. १२ जानेवारी २०१४ रोजी झालेल्या विद्यापीठ स्तरीय दृष्टी अभियानात २ स्वयंसेवकांचा सहभाग.

### विशेष हिवाळी शिबिर

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष हिवाळी शिबिर दि. १५ डिसेंबर ते २१ डिसेंबर २०१३ या कालावधीत गर्दणी, ता. अकोले या गावी घेण्यात आले. दि. १५ डिसेंबर २०१३ रोजी दुपारी ठिक ३.०० वा. शिबीराचे उद्घाटन झाले. या शिबीरातून ग्रामस्वच्छता , श्रमसंस्कार प्रबोधन, काव्यरत्न अभियान, एडस् जन-जागृती अभियान, लोकसंख्येचे सर्वेक्षण इ. उपक्रम राबविण्यात आले. गर्दणी गावचे ग्रामदैवत, रत्नाई देवीचा डोंगर याठीकाणी पायऱ्या बांधण्यासाठी दगड व वाळू डोंगरावर नेण्याची कामे स्वयंसेवकांनी केली. या कामाचे एकूण मुल्य ८०,०००/- (ऐंशी हजार) एवढे झाले. त्याच प्रमाणे स्वयंसेवकांनी तज्ज्ञ व्यक्तींची व्याख्याने आयोजित केली. जि.प.सदस्य मा. पर्बतराव नाईकवाडी , सरपंच , उपसरपंच व समस्त ग्रामस्थ गर्दनी यांचे विशेष सहकार्य लाभले.

### आरोग्य तपासणी व रक्तदान शिबीर

दि. ४ जानेवारी २०१४ रोजी महाविदयातयात एकदिवसीय आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २५० महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला. या वेळी डॉ. अनिल देशमुख, डॉ. निलेश सहाणे, डॉ.कु. निलम हांडे यांचे मार्गदर्शन घेण्यात आले. याच वेळी संगमनेर येथिल अर्पण ब्लड बँकेचे सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ५० पिशव्या रक्तदान करण्यात आल्या.

### कार्यक्रम अधिकारी सहभाग

पुणे विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाच्या वतीने आयोजित केलेल्या नियोजन बैठका व कार्यशाळा यात कार्यक्रम अधिकारी डॉ. बाबासाहेब देशमुख, प्रा. भानुदास खताळ, प्राध्यापिका सौ. महेजबिन सय्यद यांनी सहभाग नोंदवला.

राष्ट्रीय सेवा योजनेचे वरील उपक्रमशील आयोजन करण्यासाठी मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांचे मार्गदर्शन लाभले. त्याचप्रमाणे सहकार्यक्रम अधिकारी प्राध्यापिका सौ. महेजबिन सय्यद व प्रा. भानुदास खताळ , प्रा. व्ही. जी. कोटकर, प्रा. देवदत्त शेटे व प्रा. वावळे यांचे सहकार्य लाभले. तसेच प्रा.

बाळासाहेब मेहेत्रे, प्रा. के.बी. नाईकवाडी, प्रा. डॉ. अशोक दातीर, प्रा. राहुल वाघमारे यांचे विशेष सहकार्य मिळाले. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी श्री वसंत जुडगुले यांचेही सहकार्य लाभले. राष्ट्रीय सेवा योजनेतील कार्यक्रम अधिकारी म्हणून मी सर्वांचा आभारी आहे.

## विद्यार्थी कल्याण मंडळ

**प्रा. डॉ. अशोक दातीर**

**विभाग प्रमुख**

२०१३-१४ या शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थी कला मंडळाअंतर्गत अनेक योजनांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या हिताचे व उपयोगाचे अनेक कार्यक्रम राबविण्यात आले. या वर्षी अतुलनीय अशा विद्यापीठ स्तरावरील गिर्यारोहण व जीवसृष्टीचा अभ्यास शिबिर रतनगड येथे राबविले. विद्यार्थींनी व्यक्तिमत्व विकास योजनेअंतर्गत गरुवार दि. २६/१२/२०१३ रोजी एक दिवसाचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी मा. स्मिता गुणे, मा. सुनिता भोसले, मा. रजनीताई आंबरे यांनी विद्यार्थीनींना मार्गदर्शन केले.

पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळ योजनेतून अपघातात दुर्दैवी निधन झालेल्या कै. हर्षवर्धन भगवान जोरवर या विद्यार्थाचे वडील श्री. भगवान नामदेव जोरवर यांना रु. ५०,०००/- चा धनादेश पालकमंत्री ना. मधुकरराव पिचड साहेब यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. होतकरू व गुणवंत विद्यार्थ्यांकरीता विद्यापीठ विविध आर्थीक योजनांचा व शिष्यवृत्यांच्या माध्यमांतून मदत करते. या योजनेअंतर्गत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले अर्थसहाय्य योजना, आर्थिक दुर्बल घटक शाहू महाराज शिष्यवृत्ती व पुणे विद्यापीठ गुणवंत विद्यार्थी शिष्यवृत्तीमधून १३७ विद्यार्थी - विद्यार्थीनींचे प्रस्ताव सादर केलेले आहेत. विद्यार्थी कला मंडळाअंतर्गत निर्भय कन्या अभियान व आपत्ती व्यवस्थापनाचे आयोजन केले जाते.

## यु.जी.सी. विभाग

**प्रा. बाळासाहेब मेहेत्रे**

**समन्वयक**

महाविद्यालयात युजीसीच्या १२ व्या योजनेअंतर्गत Additional Assiustance to College already covered under 12 (B) of UGC या स्किममधून ५० लाख रुपयांचे अनुदान मंजुर झाले. यापैकी २० लाख रूपये प्राप्त झाले आहे. वरील अनुदानातून Chemistry, Physics, Botany, Zoology, Geography, Computer हे विभाग डिजीटल करण्यात आले. महाविद्यालयातील सर्व विभाग इंटरकॉमने जोडण्यात आले असून आवश्यक तेथे सीसी टिव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. ग्रंथालयात Network Access Centre सुरू करण्यात आले असून त्यामुळे विद्यार्थ्यांना माफक दरात ऑनलाईन फॉर्म भरणे सोईचे झाले आहे. तसेच संगणक, प्रिंटर, नेटवर्कींग साहित्य खरेदी करण्यात आले आहे. Electronics Lab, Mathematics विभाग अद्ययावत करण्यात आले. यासर्व योजना राबविणेसाठी प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांचे मार्गदर्शनाखाली प्रा. एस. के. मालुंजकर, प्रा. के.एस. गुंजाळ, प्रा. डॉ. राहूल भोसले, प्रा. पी.जे. बच्छाव, प्रा. व्ही.जी. कोटकर, श्री. सी. आर. ढवळे, श्री. बाळासाहेब शेटे , श्री. सखाराम पथवे, श्रीमती पुष्पावती भुजबळ यांचे सहकार्य लाभले.

## कार्यालय

**श्री. चंद्रभान ढवळे**

**कार्यालय प्रमुख**

महाविद्यालयात कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय बी.सी.ए., बी.बी.ए., बी.ए.स्सी. (कॉम्प्युटर) एम.ए. (मराठी, हिंदी, इंग्रजी, राज्यशास्त्र, भुगोल)एम.कॉम., एम.एस्सी.(रसायनशास्त्र) हे विभाग सुरू आहेत. तसेच महाविद्यालयात येऊन शिक्षण घेणे शक्य नसल्यास विद्यार्थ्यांसाठी यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक मार्फत या संस्थेत शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. वरील सर्व अभ्यासक्रमासाठी या वर्षी अंदाजे ५००० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे. महाविद्यालयात प्रवेश घेण्यापासून ते शाळा सोडल्याचा दाखला देण्यापर्यंत सर्व कामे संगणकावर करण्यात येत आहेत.

या शैक्षणिक वर्षात वरिष्ठ महाविद्यालयाचे प्रा. बी.एम. महाले हे दि. ३१/०५/२०१३ रोजी, प्रा. ए.ए. केदार दि. ३०/०६/२०१३ रोजी व प्रा. भाटे ए.टी. हे दि. ३१/०३/२०१३ रोजी नियत वयोमानानुसार निवृत्त झाले आहेत. तर श्री. एस.एस.हुजबंद यांनी दि. १०/०४/२०१३ रोजी स्वेच्छानिवृत्ती घेतलेली असून श्री. डी.बी. रूपवते हे दि. ३०/११/२०१३ रोजी नियत वयोमानानुसार सेवा निवृत्त झाले आहेत. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. ए. एम. काळे व प्रा. बी.के.पवार सहाय्यक शिक्षक हे दि. ३१/०५/२०१४ रोजी नियत वयोमानानुसार निवृत्त होत आहेत.

महाविद्यालयात वर्षभर राबविण्यात आलेल्या सर्व

उपक्रमांत प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी आपला सहभाग नोंदविला. दैनंदिन कामकाजात महाविद्यालयाचे प्राचार्य मा. रमेशचंद्र खांडगे, उपप्राचार्य प्रा. एम.ए. काळे, पर्यवेक्षक प्रा. जी.एन. लांडगे, प्रा. जी. के. हासे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. कार्यालयीन कामकाजात प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच सर्व कनिष्ठ, वरिष्ठ महाविद्यालय विभागप्रमुख, कार्यरत प्राध्यापक, प्राध्यापिका यांचेही सहकार्य लाभले.

## कर्मवीर भाऊराव पाटील कमवा व शिका योजना

**प्रा. एस.व्ही. साळवे**

**विभाग प्रमुख**

दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी कमवा व शिका योजना राबविण्यात आली. या योजनेमध्ये एकूण १२८ विद्यार्थी-विद्यार्थिनींनी सहभाग घेतला सदर योजनेतील विद्यार्थी विद्यार्थीनींनी कार्यालयीन कामे, ग्रंथालयातील कामे, परिसर स्वच्छता, तण काढणे, झाडांना पाणी देणे यासारखी कामे केली. या कामांचे मानधन म्हणून विद्यार्थी-विद्यार्थीनींना रु. १,००,०००/- (एक लाख) मानधनापोटी अदा करण्यात आले. यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य मा. रमेशचंद्र खांडगे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

तसेच या योजनेत प्रा. डॉ. अशोक दातीर (विद्यार्थी कल्याण अधिकारी) प्रा. देवदत्त शेटे, प्रा. राहुल वाघमारे यांचे मोलाचे योगदान लाभले.

## शैक्षणिक व संशोधन विभाग

**प्रा. डॉ. अनिनाश झांबरे**

**समन्वयक**

संगमनेर येथे आयोजित अविष्कार कार्यशाळेत सबाजकर संकेत, सावंत अक्षय, शिंदे सुकृता, गडाख कोमल यांनी सहभाग नोंदविला. तसेच सबाजकर संकेत, सावंत अक्षयश शिंदे सुकृता, गडाख कोमल, सावंत आकाश, वाकचौरे प्रिती यांना झोनल लेव्हल संशोधन प्रकल्प स्पर्धेसाठी उपस्थित राहण्याची संधी मिळाली.

## परीक्षा विभाग

**प्रा. के.बी. नाईकवाडी**

**महाविद्यालय परीक्षा अधिकारी**

या वर्षीपासून सुरू झालेल्या बारकोड पद्धतीसंबंधी कार्यशाळेस प्रा. नाईकवाडी यांनी पुणे विद्यापीठ, राहुरी, संगमनेर येथे तर श्री. मधुकर मंडलीक यांनी संगमनेर व पुणे विद्यापीठ येथे सहभाग नोंदविला. महाविद्यालयातील परीक्षा विभाग व प्रश्नपत्रिका ठेवण्यासाठीची स्ट्रॉग रुम अद्ययावत करण्यात आली. लवकरच विद्यापीठाची कमिटी या विभागास भेट देणार आहे. मा. प्राचार्यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा व्यवसिथत पार पाडल्या. विशेषतः या वर्षी विद्यापीठाने काही प्रश्नपत्रिका ऑन लाईन पाठविल्या. त्यात कोठेही अडचण आली. त्यासाठी संगणक विभागाचे सहकार्य लाभले.

## सॉफ्ट स्किल्स डेव्हलपमेंट

**प्रा. डॉ. व्ही. एस. भगत**

**समन्वयक**

पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शनानुसार आपल्या महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या क्षमतांचा विकास करुन व्यवस्थापन करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. त्यासाठी महाविद्यालयात Language Laboratory विकसित केली आहे. त्यासाठी १० संगणक व संगणक प्रणाली उपलब्ध आहे. त्याकामी प्रा. डॉ. अशोक दातीर यांनी सहकार्य केले.

## ग्रंथालय विभाग

**प्रा. पी.जे. बच्छाव**

**ग्रंथपाल**

आपल्या महाविद्यालयाचे ग्रंथालय हे एक उत्कृष्ठ वाचन साहित्य असलेले ग्रंथालय आहे. आज ग्रंथालयामध्ये ५८,००० ग्रंथ व १०७ नियतकालिके आहेत. महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना तसेच प्राध्यापकांना पुस्तकांची देवाण-घेवाण करणे सोईचे व्हावे म्हणून ग्रंथालयाचे संगणकीकरण करण्यात आले आहे. तसेच ओळखपत्रे व वाचन साहित्य बारकोड केली आहेत.

ग्रंथालयाच्या विविध सेवा :

- संदर्भ सेवा
- ई- संदर्भ सेवा
- इंटरनेट सेवा
- इंटर लायब्ररी लोन
- ई-बुक्स, ई-जर्नल्स
- वर्तमानपत्रे कागदपत्रे कात्रण
- स्पर्धा परीक्षांची पुस्तके
- पुस्तके शोधण्यासाठी अत्याधुनिक संगणकीकृत तालिका (OPAC)

*** ग्रंथालयातील महत्वाच्या गोष्टी :**

१. सोल या सॉफ्टवेअरमध्ये सर्व पुसतकांची नोंद करण्यात येते.

२.युजीसी अनुदानातून संदर्भ पुस्तकांची खरेदी करण्यात आली.

३.ग्रंथालयात महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी इंटरनेट ॲक्सेस सेंटर सुरू करण्यात आले.

मा. प्राचार्य, ग्रंथालय समिती सदस्य श्री. बोडके, श्री. घुले व कर्मचारी श्री. आरोटे, श्री. फटांगरे यांच्या सहकार्याने वाटचाल यशस्वीपणे सुरू आहे.

## यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा.डॉ. ए.पी.झांबरे**

**केंद्र संयोजक**

सन २०१३-१४ या वर्षात आपल्या अभ्यास केंद्रामार्फत 'ज्ञानगंगा घरोघरी' हे ब्रिदवाक्य घेऊन समाजासमोर एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे. या अभ्यासकेंद्रात पूर्वतयारीसाठी १६१, प्रथम वर्ष कला या वर्गासाठी २०५, द्वितीय वर्ष कला वर्गासाठी १८०, तृतीय वर्ष कला या वर्गासाठी ९३ तसेच प्रथम वर्ष वाणिज्य या वर्गासाठी १६, द्वितीय वर्ष वाणिज्य या वर्गासाठी ४, तृतीय वर्ष वाणिज्य या वर्गासाठी ११ असे एकूण ६७० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक रविवारी समंत्रणाचे आयोजन केले जाते. या विद्यापीठ केंद्रातून पदवी घेतलेल्या ६ विद्यार्थ्यांची पोलीस उपनिरीक्षक पदी नियुक्ती झाली. मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संजय फटांगरे व श्री. हेमंत सोनवणे यांच्या सहकार्याने कामकाज चालू आहे.

## नालंदा अभ्यास केंद्र : स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन

**प्रा.डॉ. व्ही.एस. भगत**

**समन्वयक**

विद्यापीठ अनुदान आयोगाच्या Coaching classes for Entry in Services for SC/ST/NT/OBC (non-creamy layer) and Minorities under the UGC या योजनेतून महाविद्यालयात स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी नालंदा अभ्यास केंद्राची कायमस्वरुपी स्थापना करण्यात आली. त्यामुळे महाविद्यालयातील १२ विद्यार्थी यशस्वी झाले. केंद्र सहायय्क श्री. सचिन दोरगे तसेच सहकाऱ्यांचे सर्वच कार्यात विशेष योगदान लाभले.

## वाद-विवाद मंडळ

**प्रा.गाडेकर डी.जे.**

**प्रमुख**

सन २०१३-१४ मध्ये वा-विवाद मंडळामार्फत कवी अनंत फंदी प्रतिष्ठान संगमनेर यांचे विद्यमाने भाऊसाहेब गुंजाळ पाटील सह्याद्री ज्युनिअर कॉलेज, संगमनेर येथे दि. २७ सप्टेंबर २०१३ रोजी झालेल्या आंतर महाविद्यालयीन वाद-विवाद स्पर्धेत आपल्या महाविद्यालयातील कु. आव्हाड राहूल शरद यास वैयक्तिक प्रथम क्रमांक मिळाला. तसेच या स्पर्धेत कु. सय्यद आयेशा इम्रान हिने स्पर्धेत सहभाग नोंदविला.

२४ डिसेंबर २०१३ रोजी झालेल्या वाद-विवाद स्पर्धेसाठी बहुजन विद्यार्थी संघटना व संगमनेर महाविद्यालय आयोजित भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाद-विवाद राज्यस्तरीय स्पर्धेत वैयक्तिक प्रथम क्रमांक कु. राहूल शरद आव्हाड यास मिळाले. तसेच या स्पर्धेत जगताप निखिल संजय यांनी स्पर्धेत सहभाग नोंदविला. यांस प्रा. डी.डी. शेटे यांचे सहकार्य लाभले.

## वाणिज्य मंडळ

**प्रा.सौ. सय्यद महेजबिन**

**अध्यक्षा**

विद्यार्थ्यांना व्यावसायिक व व्यावहारिक ज्ञान देतानाच, समाजाप्रति संवेदनशीलता व जबाबदार नागरिकत्व आणि नेतृत्वगुण विकसित करण्याच्या उद्देशाने वाणिज्य मंडळाने पुढील प्रमाणे कार्य केले आहे. मंडळाच्या वतीने शिक्षक दिन, रक्षा बंधन कार्यक्रम साजरे करण्यात आले. सहलीद्वारे विद्यार्थ्यांना कोकण दर्शन घडविण्यात आले.

दि. ०६/०१/२०१४ व ०७/०१/२०१४ या कालावधीत वाणिज्य महोत्सव पार पडला. दरवर्षी वाणिज्य विभागाचे विद्यार्थी वाणिज्य महोत्सव आयोजित करतात. या महोत्सवाच्या निमित्ताने व्यवस्थापन, प्रशासन, पाहुण्यांशी संज्ञापन, विविध कार्यक्रमांचे आयोजन इ. सर्व कामांचा प्रत्यक्ष अनुभव विद्यार्थ्यांना देण्याचा प्रयत्न केला जातो. महोत्सवाचे उदघाटन तहसिलदार मा. चंद्रशेखर देशमुख यांच्या हस्ते झाले. महोत्सवात मा. नवनाथ नवले (उद्योजक अकोले) मा. अविनाश गोडसे (सी.एस.ब्रॉडकॉस्ट इनिशिएटिव्हज,पुणे) मा. सुनीता भोसले, (मुख्य व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र) मा. राणी गुप्ता (पी.आर.ओ. ग्लोबल व्हिजन कॅन्सर केअर) यांनी मार्गदर्शन केले. मा. हेमंतजी राठी (चेअरमन, एम्पायर स्पायसेस ॲण्ड फुड बी नाशिक ब्रॅण्ड नेम - रामबंधु मसाले) यांचे हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. वाणिज्य महोत्सवात व दरम्यान वाद-विवाद स्पर्धा , रांगोळी स्पर्धा, ट्रॅडीशनल रॅम्प वॉक, फोटोग्राफी स्पर्धा, पोस्टर स्पर्धा, गट चर्चा,पेपर प्रेझेंटेशन, १ मिनिट शो, अंताक्षरी स्पर्धा, बुलेटीन प्रकाशन, मि. ॲण्ड मिस कॉमर्स स्पर्धा,

म्युझिकल फीश पाँड हे उपक्रम राबविण्यात आले.

उपक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा. एस.ए. पलांडे, प्रा. व्ही.के. भांगरे, प्रा. देवदत्त शेटे, प्रा. कांचन कातोरे , प्रा. धुमाळ , प्रा. नवले, प्रा. कोटकर , प्रा. रंजना कदम यांचे सहकार्य लाभले.

## आरोग्य विभाग

**प्रा.वाय.जी. सय्यद**

**समन्वयक**

या योजनेअंतर्गत प्रथम वर्ष विज्ञान, कला, वाणिज्य, बी.बी.ए., बी.सी.एस., बी.सी.ए., या वर्गातील १०१२ विद्यार्थ्यांची सक्तीची वैद्यकीय तपासणी प्रा. डॉ. निलेश सहाणे व प्रा. डॉ. निलीमा हांडे यांनी केली. शिबीरात विद्यार्थ्यांना आरोग्य संवर्धनाकरीता योग्य त्या सूचना व सल्ला देण्यात आला.

याकामी प्रा. खाटीक, प्रा.कु. तांबे, प्रा. पुंडे, प्रा. फलके, श्री. अशोक वामन यांचे सहकार्य लाभले

## विज्ञान मंडळ

**प्रा.एम.डी. बाणाईत**

**प्रमुख**

विज्ञान मंडळातर्फे निबंध स्पर्धा दि. १०/०१/२०१४ रोजी घेण्यात आली. निबंध स्पर्धेसाठी प्रा. के. बी. नाईकवाडी, प्रा. बी.के. भांगरे व प्रा. कासार यांनी सहकार्य केले.

## मागासवर्गीय विद्यार्थी सेल

**प्रा. साहेबराव गायकवाड**

**संयोजक – नोडल अधिकारी**

विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, अहमदनगर यांचे आदेशानुसार महाविद्यालयात मागासवर्गीय सेल कार्यरत असून शिष्यवृत्ती संबंधी आलेल्या अडचणी दूर करण्याचे काम करते. या उपक्रमासाठी सर्वच सदस्य नेहमीच सहकार्य करीत आहेत.

## सामाजिक समता मंडळ

**प्रा. साहेबराव गायकवाड**

**अध्यक्ष**

सन २०१३-१४ च्या स्नेहसंमेलनानिमित्त दि. ३१/१/२०१४ रोजी निबंध स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा व काव्य वाचन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या सर्व सपर्धांचे विषय स्त्री-पुरूष समानतेवर व आपल्या समाजासमोरील ज्वलंत समस्यावंर आधारीत होते.

## शैक्षणिक सहल विभाग

**प्रा.डॉ. एस.बी. खेमनर**

**विभाग प्रमुख**

सन २०१३-१४ मध्ये विविध शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात आले. वाणिज्य विभागाची पाली, महाड, हरिहरेश्वर येथे, वनस्पती शास्त्र विभागाची भिमाशंकर हरिचंद्रगड येथे तर भूगोल विभागाची हरिचंद्र गड येथे सहलींचे आयोजन करण्यात आले. यावेळी सर्व सहकाऱ्यांनी सहकार्य केले.

## बहिःशाल शिक्षण मंडळ

**प्रा. भानुदास खताळ**

**विभाग प्रमुख**

सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात बहिःशाल शिक्षण मंडळातर्फे दि. १७/१२/२०१३ ते १९/१२/२०१३ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्याख्यानमालेचे गर्दनी येथे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी श्री. किसन भाऊ हासे यांनी 'नवा महाराष्ट्र युवा महाराष्ट्र' या विषयावर मार्गदर्शन केले. सदर उपक्रमासाठी मा. प्रा. रमेशचंद्र खांडगे, प्रा.डॉ. देशमुख, प्रा.डॉ. खेमनर , प्रा. वावळे यांचे सहकार्य लाभले.

## एम. कॉम विभाग

**एस.ए.पलांडे**

**विभाग प्रमुख**

शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये एम.कॉम भाग १ व २ अनुक्रमे ६७ व २७ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. वर्षभरात तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करण्यात आली. यामध्ये मा. सुनिता भोसले (मुख्य व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र) मा. हेमंतजी राठी (चेअरमन, एम्पायर स्पयसेस ॲण्ड फुड लि. नाशिक ब्रॅण्ड नेम – रामबंधू मसाले) यांचा समावेश होता. सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रा.सौ.एम.डी.सय्यद, प्रा. व्ही.के.भांगरे, प्रा. देवदत्त शेटे, प्रा. कांचन कातोरे, प्रा. धुमाळ, प्रा. नवले, प्रा. कोटकर , प्रा.डॉ.सौ. रंजना कदम यांचे सहकार्य लाभले.

## रसायनशास्त्र विभाग (पदव्यूत्तर)

**प्रा. डॉ. एस.बी. ताकटे**

**विभाग प्रमुख**

सन २०१३-१४ मध्ये एम.एस्सी भाग १ या वर्गात २४ तर एम.एस्सी. भाग २ या वर्गात २६ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. विद्यार्थ्यांना रसायनशास्त्रातील विविध अभ्यासक्रमांची ओळख म्हणून विभागामध्ये कोर्सेस अफ्टर बी.एस्सी. केमिस्ट्री व पदवी पूर्ण केल्यानंतर उपलब्ध असणाऱ्या रोजगार व स्वयंरोजगार

संधींची माहिती व्हावी म्हणून करिअर अफ्टर बी.एस्सी. / एम.एस्सी. या माहिती फलकांचे अनावरण करण्यात आले.

विभागातील प्रा. संदेश कासार व प्रा. अरूण वाकचौरे यांनी पी.व्ही.पी. विद्यालय, लोणी येथे पार पडलेल्या एम.एस्सी. केमिस्ट्री अभ्यासक्रम श्रेयांक पद्धती कार्यशाळेत सहभाग घेतला. प्रा. डॉ. एस.एम. सोनवणे यांनी कऱ्हाड, आळेफाटा व पाथर्डी येथे पार पडलेल्या राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये शोधनिबंधांचे वाचन केले.

## गणित विभाग

**प्रा. बाळासाहेब मेहेत्रे**

**विभाग प्रमुख**

गणित विभागात एकुण २४७ विद्यार्थी असून गणिताची रुची वाढावी म्हणून त्यांना मार्गदर्शन केले जाते. डॉ. होमी भाभा सेंटर ऑफ सायन्स एज्युकेशन, टी.आय.एफ.आर, मुंबई व एस.पी. कॉलेज पुणे यांचे संयुक्त विद्यमाने 'माधवा मॅथेमॅटीक्स' हि स्पर्धा सलग ४ थ्या वर्षी आपल्या महाविद्यालयात घेण्यात आली. या स्पर्धेस नॅशनल बोर्ड ऑफ हायर मॅथेमॅटीक्स, नवी दिल्ली या संस्थेकडून अनुदान मिळते. या वर्षी या परीक्षेस १३९ विद्यार्थी बसले. तसेच विद्यार्थी कल्याण मंडळ, पुणे व रा.ब. नारायणराव बोरावके महाविद्यालय, श्रीरामपूर येथे आयोजित गणित विषयाच्या विशेष शिबीरात ६ विद्यार्थी सहभागी झाले होते. या विद्यार्थ्यांना प्रा. सौ. स्वाती देशमुख, प्रा. ठुबे यांचे मार्गदर्शन लाभले.

## प्राणिशास्त्र विभाग

**प्रा. के.बी. नाईकवाडी**

**विभाग प्रमुख**

प्राणिशास्त्र विभागाची प्रयोगशाळा डिजीटल करण्यात आली. त्यात नविन मायक्रोस्कोपची भर पडली. या बाबींचा अध्यापन व अध्ययनात अद्ययावतपणा वाढवण्यात उपयोग झाला. विभागाच्या वतीने वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयात एडस् जनजागृती करण्यात आली. तसेच शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात आले. यावेळी सर्व सहकार्यांचे सहकार्य मिळाले.

## संगणकशास्त्र व व्यवस्थापन विभाग

**प्रा. के.एस. गुंजाळ**

**विभाग प्रमुख**

विभागाच्या वतीने नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत द्वितीय व तृतीय वर्षातील बी.बी.ए., बी.सी.ए. व बी.सी.एस. या वर्गातील विद्यार्थ्यांनी केले. संख्यात्मक गुणांऐवजी गुणवत्ता व दर्जा उंचावण्यासाठी नामवंत व्याख्यात्यांची व्याख्याने आयोजित करण्यात आली होती. संगणक प्रदर्शन व सहलींचे आयोजनही करण्यात आले. या सर्व उपक्रमांसाठी विभागातील सर्व सहकार्यांचे मोलाचे सहकार्य व योगदान लाभले.

## हिंदी विभाग

**प्रा.डॉ.सौ.ए.एम.शेख**

**विभाग प्रमुख**

महाविद्यालयात हिंदी विभागातर्फे दरवर्षी १४ सप्टेंबरला हिंदी समारोह हा कार्यक्रम अयोजित केलाजातो. यावर्षी आपल्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी व राजूर येथिल महाविद्यालयाचे प्रा. भरत शेणकर यांना प्रमुख पाहुणे म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. यावेळी त्यांनी रोजगार व हिंदी या विषयी मार्गदर्शन केले. तसेच विभागाच्या वतीने एक दिवसीय सहलीचे आयोजन करण्यात आले. यावेळी मा. प्राचार्य रमेशचंद्रजी खांडगे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

## भूगोल विभाग

**प्रा.डॉ.एस. बी. खेमनर**

**विभाग प्रमुख**

सन २०१३-१४ मध्ये विविध शैक्षणिक सहली, ग्रामसर्वेक्षण करण्यात आले. आपले महाविद्यालयात महाराष्ट्र भूगोल शास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ४ फेब्रुवारी ते ६ फेब्रुवारी २०१४ या कालावधीत राष्ट्रीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या सर्व कामी प्रा.डॉ. विजय भगत, प्रा. वावळे, प्रा. गाडेकर, प्रा. पुंडे , प्रा. दत्तात्रय वाघमारे,प्रा. कोटकर, प्रा. मनिषा नाईकवाडी व श्री. पडवळ यांचे सहकार्य लाभत आहे.

## भूगोल पदव्यूत्तर विभाग

**प्रा.डॉ.व्ही.एस.भगत**

महाविद्यालयात पी.एच.डी. पदवीसाठी भूगोल पदव्युत्तर संशोधन केंद्रास शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून पुणे विद्यापिठाने मान्यता दिली आहे. त्यासाठी विभागास संगणक प्रयोगशाळा , जी.आय.एस. प्रणाली व सुदूर संवेदन प्रयोगशाळा व आवश्यक पायाभूत सुविधा उभारण्यात आल्या. नाशिक येथिल व्ही.एन.नाईक महाविद्यालयातील प्राध्यापक राजेंद्र झोळेकर हे प्रा. डॉ. व्ही.एस. भगत यांच्या मार्गदर्शनाखाली Ph.D करीत आहेत. त्यांना UGC ने Ph.D साठी दोन वर्षाकरीता फेलोशिप दिलेली आहे. दि. ४ ते ६ फेब्रुवारी २०१४ रोजी Monitoring Degarded Lands या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन

करण्यात आले. याकामी सर्वांचे सहकार्य मिळत आहे.

## मराठी विभाग

**प्रा.डॉ.सौ. रंजना कदम**

**विभाग प्रमुख**

मराठी विभागातर्फे दि. २४ सप्टेंबर २०१३ रोजी 'मराठी साहित्य' या विषयावर प्रा. मा.रा. लामखडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. पुणे विद्यापीठात होणाऱ्या आविष्कार स्पर्धेत कु. शिंदे सुकृता सनील व कु. गडाख कोमल चांगदेव यांनी सहभाग घेतला. यापैकी कु. शिंदे सुकृता सुनील हिची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. राज्यस्तरीय खुल्या कविता स्पर्धेत कु. निलम सुनील नागरे हिची निवड झाली. २७ फेब्रुवारी २०१४ रोजी 'मराठी दिन' मराठी विभागातर्फे साजरा करण्यात आला. 'मराठी भाषा आणि संस्कृती ' या विषयावर प्रा. डॉ. महेंद्र कदम (टेंभूर्णी महाविद्यालय सोलापूर) यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. ५ फेब्रुवारी रोजी शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. २८ मार्च २०१४ रोजी टी.वाय. बी.ए. व एम.ए. II च्या मुलांचा समारोप संमारंभ सादर करण्यात आला.

## राज्यशास्त्र पदव्यूत्तर विभाग

**प्रा.वाय.जी. सय्यद**

**विभाग प्रमुख**

राज्यशास्त्र विषयाचा पदव्यूत्तर अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २००६-२००७ पासून आपल्या महाविद्यालयात सुरू करण्यात आला. यावर्षी एम.ए. भाग १ सेमिस्टर पद्धतीने १२ व एम.ए. भाग १ श्रेयांक पद्धतीत ४२ विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. विद्यार्थ्यांसाठी सेमिनार, शोधप्रकल्प, चर्चासत्र इ. चे आयोजन करण्यात आले. विभागातील प्रा. कोकणे, प्रा. कर्पे, प्रा. आवारी, प्रा. पवार यांचे उत्फूर्त सहकार्य लाभले.

## स्टाफ सेक्रेटरी

**प्रा.डॉ. रंजना मधुकर कदम**

चालु शैक्षणिक वर्षात वर्गांसाठी नवीन फळे आणि लेक्चर स्टँडची व्यवस्था करण्यात आली. तसेच स्टाफरुमसाठी आणि सर्व विभागांसाठी खुर्च्यांची व्यवस्था करण्यात आली. स्टाफच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती रुजविण्यासाठी पुणे विद्यापीठ अंतर्गत होणाऱ्या अविष्कार स्पर्धेची माहिती करून देण्यासाठी मा.डॉ. अरूण गुजराथी संगमनेर यांचे व्याख्यान विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आले. दादासाहेब फाळके पुरस्कार प्राप्त अभिनेते प्राण, कालनिर्णयचे संपादक श्री. जयंत साळगावकर, अंधश्रद्धा विरोधी लढा समितीचे डॉ. नरेंद्र दाभोळकर, मुस्लीम विचारवंत असगर,अली इंजिनियर, डॉल्बी ध्वनियंत्रणेचे जनक रे डॉल्बी, लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या सुश्मिता बॅनर्जी, साहित्यिक डॉ. भास्करराव खांडगे, ज्येष्ठ दलित साहित्यिक नामदेव ढसाळ इत्यादींना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. वर्षभरात ज्या सभा घेण्यात आल्या, त्या सर्व सभा यशस्वी पार पडल्या.

## विद्यापीठस्तरीय गिर्यारोहण व जीवसृष्टीचा अभ्यास शिबीर

(४ ते ६ जानेवारी २०१४)

**प्रा.डॉ. अशोक दातीर**

**विद्यार्थी कल्याण अधिकारी**

महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा अहमदनगर जिल्हयाचे पालकमंत्री व अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे कार्यकारी विश्वस्त मा. ना. मधुकररावजी पिचड साहेब यांच्या शुभहस्ते व पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक व राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी मा. डॉ. पंडितराव शेळके यांच्या अध्यक्षतेने उद्घाटन झालेले विद्यापीठस्तरीय गिर्यारोहण व जीवसृष्टीचा अभ्यास हे शिबीर शनिवार दिनांक ४ जानेवारी ते सोमवार दिनांक ६ जानेवारी २०१४ या कालावधीमध्ये यशस्विरीत्या संपन्न झाले आणि अ.ता.ए. सोसायटीच्या व अगस्ति कला, वाणिज्य व दादासाहेब रूपवते विज्ञान महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला. अनेक बाबतीत हे शिबीर महाविद्यालयाची कसोटी तपासणारे व त्या कसोट्यांना पात्र ठरणारे झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली नव्हे एखाद्या टीमचे नेतृत्व करणाऱ्या लिडर च्या लिडरशिपखाली काम करणाऱ्या महाविद्यालयांच्या प्राध्यापकांचे, प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे आणि विद्यार्थ्यांचे टीमवर्क या शिबीराच्या यशस्वितेची की-पॉइंट ठरली.

कोणत्याही उपक्रमाच्या कामांची सुरुवात ही प्रत्यक्ष त्या उपक्रमाच्या कालावधीच्या कित्येक दिवस अगोदरपासूनच होत असते तसेच याही शिबीराच्या संदर्भात सांगता येईल. महाविद्यालयाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाने अशा प्रकारच्या शिबीराची कल्पना मांडल्यानंतर, प्राचार्यांनी विद्यापीठस्तरीय शिबिराचा प्रस्ताव विद्यापीठात सादर करण्यास परवानगी दिली व तसा प्रस्ताव विद्यापीठास सादर करण्यात आला. प्रस्ताव मंजूर करण्यापूर्वी विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक मा. डॉ. पंडितराव शेळके व जिल्हा समन्वयक प्रा. रोहिदास कोल्हे यांनी सदर शिबीराच्या ठिकाणची प्रत्यक्ष येऊन पाहणी केली. प्रस्ताव मंजूर केल्यानंतर महाविद्यालयाने

विद्यापीठाशी संलग्न असलेल्या नाशिक, नगर व पुणे या तीनही जिल्ह्यातील प्रत्येक महाविद्यालयाला विद्यार्थी पाठवण्याविषयी ई-मेल व सरफेस मेल द्वारे संपर्क केला. पुणे विद्यापीठाच्या वेबसाईटवरही तसे आवाहन/निमंत्रण देण्यात आले. अनेक महाविद्यालयांनी ई-मेलद्वारे आपापल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची शिबीरासाठी नोंदणी केली. दरम्यान आपल्या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. बाबासाहेब देशमुख, महाविद्यालयातील विद्यापीठ अनुदान आयोग समितीचे प्रमुख प्रा. बाळासाहेब मेहेत्रे, विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष प्रा. राहुल वाघमारे, प्रा. सुनील घनकुटे व शिबीराचे संयोजक डॉ. अशोक दातीर यांनी शिबीराच्या ठिकाणी म्हणजे रतनवाडी येथे प्रत्यक्ष भेट देऊन शिबीरार्थीच्या निवास, भोजनविषयक व्यवस्था केली व त्यांच्या सुरक्षेसंबंधी उपाययोजनांची पाहणी करून आवश्यक ती व्यवस्था केली. या कामी रतनवाडी येथील सरपंच मा. सखूबाई झडे, सदस्य श्री. संपत झडे , श्री. देवराम झडे व ग्रामस्थ यांची मदत झाली. तसेच मुलींच्या निवासव्यवस्थेसाठी प्रकल्प अधिकारी मा. डॉ. तुकाराम पिचड यांची विशेष मदत झाली.

शिबिराच्या प्रथम दिवशी म्हणजे शनिवार दि. ४ जानेवारी २०१४ ला विविध महाविद्यालयातील विद्यार्थी महाविद्यालयात सकाळी ८.३० पासूनच येण्यास सुरूवात झाली. विद्यार्थ्यांच्या रजिस्ट्रेशनची व्यवस्था महाविद्यालयात करण्यात आलेली होतीच. विद्यार्थ्यांना येथे फूड पॅकेट, नोटपॅड, पेन, शिबिराची माहिती पुस्तिका आणि एकूण कार्यक्रमांचे वेळापत्रक देण्यात आले. साधारणत; ८०% विद्यार्थी दुपारी १२.३० पर्यंत आलेली होती. त्यांना एकत्र जमवून सूचना देण्यात आल्या. प्राचार्यांनी सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत केले व ओळख करून घेतली तसेच डॉ. देशमुख यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शक सूचना दिल्या. तोपर्यंत प्रा. बाळासाहेब मेहेत्रे यांनी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या अकोले आगारातील बसेस महाविद्यालयाच्या गेट वर आणून ठेवण्याची व्यवस्था केलेली होतीच. शिबिरार्थींचा प्रवास सुखकर व सुरक्षित होण्याच्या दृष्टीने संस्थेच्या व प्राचार्यांच्या सूचनेवरून एस.टी. महामंडळाच्या बसेसचा प्रवासासाठी उपयोग करण्यात आला. एकूण तीन बसेस क्रमा-क्रमाने दुपारी १२.३०, १.०० व २.०० वाजता शिबिरार्थींना घेऊन महाविद्यालयातून - रतनवाडीकडे जाण्यासाठी निघाल्या. दुपारी २.३० ते ३.३० पर्यंत या सर्व बसेस रतनवाडी येथे पोहोचल्या. प्रत्येक बसमध्ये विद्यार्थ्यांसोबत महाविद्यालयाचे प्राध्यापक व प्राध्यापिका होत्या.त्यासाठी प्रा. केशव नाईकवाडी, प्राध्यापिका बोरसे, प्रा. नाईकवाडी, प्रा. वर्पे, प्रा. रेवगडे तसेच श्री. कडलग यांनी जबाबदारी स्विकारली. महामंडळाच्या कर्मचार्यांनी सुरक्षितपणे या शिबिरार्थिंना रतनवाडी येथे पोहोच केले.

इकडे, महाविद्यालयामध्ये मुलांचे आगमन, रजिस्ट्रेशन व रतनवाडीकडे जाण्याची व्यवस्था चालू असतानाच तिकडे, रतनवाडी येथे अमृतेश्वर मंदिराच्या पारिसरामध्ये शिबिराची व शिबिराच्या उद्घाटनाची व्यवस्था, विद्यार्थ्यांच्या निवास व भोजनाची व्यवस्था पाहण्यासाठी प्रा. राहुल वाघमारे, प्रा. सुनील घनकुटे, प्रा. खताळ, श्री. बाळासाहेब मेंगाळ व स्वयंसेवक विद्यार्थी सकाळीच ७.३० वा. महाविद्यालयातून आवश्यक असलेले साहित्य घेऊन रतनवाडी येथे रवाना झाले होते. शिबिरार्थी विद्यार्थी रतनवाडी येथे पोहोचेपर्यंत या टीमने सर्व व्यवस्था केलेली होती. विद्यार्थी रतनवाडी येथे पोहोचल्याबरोबर भोजन देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहर्यावरील समाधान, उत्साह व उत्सुकता पाहून आम्हा सर्वांना एक सुखद असा अनुभव देऊन गेला. त्यामुळे पुढील कामांसाठी आम्हा सर्वांना जी शक्ती मिळाली ती शिबिराच्या यशस्वीतेसाठी उपयोगाची ठरली.

उद्घाटनाच्या वेळेपूर्वीच संस्थेचे अध्यक्ष मा. जे. डी. आंबरेपाटील, सेक्रेटरी मा. यशवंत आभाळे, पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक मा. डॉ. पंडितराव शेळके, संस्थेचे खजिनदार मा. ॲड. किसनराव हांडे, सदस्य मा. पुंजापाटील आवारी, प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, विद्यापीठ कल्याण मंडळाचे अहमदनगर जिल्हा समन्वयक मा. प्रा. रोहिदास कोल्हे, विद्यापीठ कल्याण मंडळाचे श्री. देवके तसेच पत्रकार मा. प्रकाश टाकळकर, मा. श्रीनिवास रेणुकादास, मा. हेमंत आवारी, मा. विलास तुपे, मा. शांताराम काळे, मा. नंदकुमार मंडलिक, साधन व्यक्ति मा. डॉ. विद्या अत्रेय, मा. डॉ. अनिल देशमुख इ. मान्यवर उपस्थित झाले होते. वनविभाग व अभयारण्य विभागाचे अधिकारी व कर्मचारीही या कार्यक्रमास उपस्थित झाली.

महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा अहमदनगर जिल्हयाचे पालकमंत्री मा. ना. मधुकररावजी पिचड साहेब, मा. वैभवराव पिचड, मा. मिनानाथजी पांडे, मा. कैलास वाकचौरे, मा. शिवाजी धुमाळ, अकोले पंचायत समितीच्या सभापती मा. श्रीमती अंजांनाताई बोंबले, सौ. पोखरकर, मा. कल्पनाताई सुरपुरिया, राजुर येथील प्रकल्प कार्यालयाचे प्रकल्प अधिकारी मा. डॉ. तुकाराम पिचड, पंचायत समिति अकोलेचे गटविकास अधिकारी मा. दिलीप रूपवते, मा. पी. टी. पाटील इ. मान्यवर उपस्थित झाले.

मा. ना. मधुकररावजी पिचड साहेब यांनी अमृतेश्वरास पुष्पहार व श्रीफळ अर्पण करून शिबिराचे उदघाटन केले. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांनी कार्यक्रमास आलेल्या सर्व मान्यवरांचे व

विविध महाविद्यालयांमधून आलेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेच्या व महाविद्यालयाच्या वतीने स्वागत केले. शिबिराचे संयोजक डॉ. अशोक दातीर यांनी शिबिराचा उद्देश स्पष्ट केला. संस्थेचे विस्तारप्रमुख मा. मीनानाथ पांडे यांनी आदिवासी परिसरातील विकासाचा आढावा घेतला. मा. डॉ. पंडितराव शेळके यांनी विद्यापीठ विद्यार्थ्यांसाठी राबवत असलेल्या विविध योजनांविषयी माहिती दिली व शिबिरार्थिंकडून या शिबिराच्या माध्यमातून काही अपेक्षा व्यक्त केल्या. मा. ना. मधुकररावजी पिचड साहेब यांनी आदिवासी माणसाचा प्रेमळ स्वभाव, आदिवासी संस्कृती मुलांसमोर व्यक्त केली व शिबिराचे उद्घाटन झाल्याचे घोषित केले. कार्यक्रमाच्या शेवटी प्रा. बाळासाहेब महेत्रे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

प्रत्यक्ष गिर्यारोहण व तेथील अभ्यास करण्यासाठी अगोदर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणे आवश्यक असल्याने मा. डॉ. अनिल देशमुख यांचे गिर्यारोहण या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्यांनीत्यांच्या अनुभव कथनातून शिबिरार्थ्यांना गिर्यारोहण करताना घ्यावयाची काळजी तसेच निसर्ग जपण्याचे आवाहन केले. त्यानंतर इंदापूर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय चाकणे यांनी गडांचा इतिहास, गिर्यारोहणाचे जीवनातील महत्व तसेच गडांचा इतिहास का जपायचा व का जगायचा इत्यादी विषयावर मार्गदर्शन केले. मा. डॉ. विद्या अत्रेय यांचे बिबटया वाघ व इतर वन्य प्राण्यांवर त्यांनी केलेल्या संशोधनावर आधारित स्लाईड शो च्या माध्यामातून व्याख्यान दिले. त्यानंतर मा. प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांनी शिबीरार्थीना आवश्यक त्या सूचना देऊन त्यांना दुसर्या दिवसासाठी शुभेच्छा दिल्या.

शिबिराच्या दुसर्या दिवशी सकाळीच मुले तयार होती. प्रा. डॉ. बाबासाहेब देशमुख, प्रा. केशव नाईकवाडी, प्रा. खताळ प्रा. राहुल वाघमारे, प्रा. सुनील घनकुटे, प्रा. सचिन बिबवे या सर्व प्राध्यापकांनी शिबीरार्थीना एकत्र जमवून कवायत व व्यायाम करून घेतला. त्यानंतर चहा व नास्ता घेऊन मुले रतनगडाकडे निघाली. रतनगडाकडे निघतानाच श्री. भाऊसाहेब कासार यांनी रतनगडाकडे जी. पी. एस. यंत्रणेच्या सहाय्याने एखाद्या ठिकाणाची समुद्रसपाटीपासूनची ऊंची कशी मोजतात याचे प्रात्यक्षिक करून दाखवले. पुढे त्यांनी गड चढत असताना वेगवेगळ्या ठिकाणांची ऊंची मोजून त्या-त्या ठिकाणी नोंदही केली. डॉ. बाबासाहेब देशमुख, प्रा. केशव नाईकवाडी हे वेगवेगळ्या वनस्पतींची माहिती, त्यांचे स्थानिक नाव, त्यांचे जीवशास्त्रीय नाव, त्यांचे उपयोग, त्यांचे औषधी उपयोग इ. माहिती देत शिबिरार्थीना गिर्यारोहणाचे प्रशिक्षण देत-देत रतनगड चढत होते. शिबिरार्थी विद्यार्थी मार्गात सापडणारे प्लॅस्टिक एकत्र करून परतताना आणता येईल म्हणून त्याचा ढीग करून ठेवत होते. गड चढतानाच्या मार्गावरील तसेच गडावरील विविध ठिकाणांची माहिती घेत, रतनगडाचे ऐतिहासिक महत्त्व, तेथील दगडी शिल्प, जैविक विविधता अभ्यासत विद्यार्थी गिर्यारोहणाचा अनुभव घेत होती. वाघतळयावर दुपारचे जेवण घेऊन मुले पुन्हा अमृतेश्वर मंदिराच्या परिसरात सायंकाळी ४.०० वा. पोहोचली. चहा घेऊन मुले येईपर्यंत आम्ही शिबिराच्या समारोपाच्या कार्यक्रमाची तयारी केली होतीच. शिबिराच्या समारोप कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. ॲड. प्रेमानंदजी रूपवतेसाहेब, प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, मा. प्रकाश टाकळकर, मा. भाऊसाहेब चासकर, मा. अमोल वैद्य इ. मान्यवर उपस्थित झाले व समारोपाचा कार्यक्रम सुरू झाला. या कार्यक्रमामध्ये अनेक शिबीरार्थीनी आपली मनोगते व्यक्त केली. मुलांना मनसोक्त बोलू दिल्यानंतर मा. ॲड. प्रेमानंद रूपवते यांनी समारोपाचे भाषण केले. विद्यार्थ्यांच्या बरोबरीने जात, विद्यार्थ्यांशी एक होऊन त्यांनी विद्यार्थ्यांची मने जिंकली. कार्यक्रमानंतरही विद्यार्थी त्यांच्याशी वेगवेगळ्या विषयांवर संवाद साधत होती. समारोपानंतर रात्रीचे भोजन झाले. भोजनानंतर शिबीरार्थीनी उस्फूर्तपने सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले.

शिबिराच्या दोनही दिवशी कडाक्याची थंडी होती. दुसर्या दिवशी मात्र थंडीने नीचांक गाठलेला होता. सांस्कृतिक कार्यक्रमानंतर शिबिरार्थी आपापल्या तंबू मध्ये जाऊन, दोन दिवसांच्या आठवणी शेअर करत झोपी जात होती. आम्ही सर्व प्राध्यापक सर्व काही ठीक आहे असे पाहून अंथरुणावर पडलो, इतक्यात काही मुले 'सर, प्रकाश कसातरीच करतोय, सर, लवकर चला' असा आवाज करत आमच्याकडे पळत आली. आम्ही लगेचच पळत त्या मुलांबरोबर गेलो तर, काही मुले घोळका करून एका मुलाला जागे करण्याचा प्रयत्न करत होती. काही मुले त्याचा तळहात व तळपाय घासत त्या मुलास सावध करण्याचा प्रयत्न करत होती. मुलांनी रिंगण मोठे करून हवा मोकळी केली. थोड्याच वेळात काही मुलांनी हाताचे स्ट्रेचर बनवून त्या मुलास आमच्या खोलीमध्ये नेले. त्या मुलास जागे करण्याचा प्रयत्न मुले करत होतीच. काही वेळाने त्या मुलाने डोळ्यांची उघडझाप केली. तरी तो पूर्णपणे सावध झालेला नव्हता. इतर काही मुलांनी खोलीमध्ये शेकोटी पेटवून ऊब निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तरीही तो मुलगा या सर्व प्रयत्नांना फारसा प्रतिसाद देत नव्हता. आम्ही सर्वांनी त्यास गाडीने डॉक्टरकडे नेण्याची तयारी केली. रतनवाडीहून जंगलातून २० किंवा ४० किमी. अंतर जावे लागणार होते. दुसरा हाच पर्याय आम्हास वाटत होता. गेल्यावर्षी

आपत्ती व्यवस्थापन शिबिरामध्ये प्रशिक्षण घेतलेली ही मुले पटापट वेगवेगळे उपाय योजत होती व प्रयत्न करत होती. एव्हाना खोलीमध्ये बर्यापैकी ऊब निर्माण झाली होती. काही वेळाने तो मुलगा सावध झाला व बोलू लागला, त्याचे नावही त्याने प्रकाश गांगड असे सांगितले आणि आम्ही निश्वास सोडला. आपत्ती व्यवस्थापन म्हणजे तरी दुसरे काय असते? चैतन्य पांगरे, श्याम वैद्य, अमोल एखंडे, घनश्याम झोळेकर, चेतन घुले, गोरख पोपेरे, अशोक भालेराव इ. विद्यार्थ्यांनी हे व्यवस्थापन केले आणि येवू घातलेल्या आपत्तीचे निवारण केले.

शिबिराच्या तिसर्या दिवशी सकाळीच ७.३० वा. काही विद्यार्थी तेथेच येणार्या मुक्कामी गाडीने आपआपल्या घराकडे जाण्यासाठी रवाना झाली. उरलेल्या मुलांना भोजन देऊन दोन बसेस मधून अकोले येथे पोहोच केले.

या शिबिरामध्ये एकूण ५७ महाविद्यालयांमधील २०४ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये १५६ विद्यार्थी व ४८ विद्यार्थिनी सहभागी झाल्या. हे विद्यार्थी ग्रामीण तसेच शहरी भागातील होते. श्री. भाऊसाहेब कासार यांनी जी. पी. एस. यंत्रणेच्या सहाय्याने मोजलेल्या विविध पॉईंट्सच्या समुद्रसपाटीपासूनची ऊंची मीटरमध्ये खालील प्रमाणे आहे.

अमृतेश्वर मंदिर ७५१२, मार्गावरील कुंड १०२६३, प्रवरेचा उगम (रत्नाई मंदिर) ११८७४, नेढं (नैसर्गिक छिद्र) १२६५५, माथा (नेढ्यावर))१२८०६, समोर दिसणारा 'खुंटा' (समांतर नजर)१२३५,

महाविद्यालयाने पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने राबविलेल्या या शिबिराच्या यशस्वीतेसाठी अनेक व्यक्तींचे, संस्थांचे सहकार्य लाभले. ऑक्झिमोअर मिनरल वॉटरचे प्रोप्रा. श्री. देशमुख साहेब, सुजाता ऑफसेट प्रिंटिग प्रेसचे नवले बंधु तसेच अर्थवेद पतसंस्थेचे अध्यक्ष मा. प्रा. बबनराव महाले यांच्या सहकार्याबद्दल आभार.

प्रा. बाळासाहेब मेहेत्रे, डॉ. बाबासाहेब देशमुख, प्रा. केशवराव नाईकवाडी यांच्या मार्गदर्शनाने तसेच प्रा. राहुल वाघमारे, प्रा. सुनील घनकुटे, प्रा. विवेक वाकचौरे, प्रा. कोरडे, प्रा. सचिन बिबवे, प्राध्यापिका बोरसे, प्रा. नाईकवाडी, प्रा. वर्पे, प्रा. रेवगडे, प्रा. कोटकर तसेच श्री. शरद कडलग, श्री. बाळासाहेब मेंगाळ यांच्या सहकार्याने हे विद्यापीठस्तरीय गिर्यारोहण व जीवसृष्टीचा अभ्यास शिबीर यशस्वीपणे पार पडले.

* * *

# वार्षिक अहवाल

## कनिष्ठ महाविद्यालय

## विद्यार्थी मंडळ :

**अध्यक्ष : प्रा. गुलाबराव देशमुख**

शैक्षणिक वर्षात गुणानुक्रमे प्रथम विद्यार्थ्याची वर्ग प्रतिनिधी म्हणून निवड करण्यात आली. कु. वृषाली पवार ही जनरल सेक्रेटरी म्हणून निवडून आली. दि. ३१ ऑगस्ट २०१३ रोजी संस्थेचे उपाध्यक्ष मा.ॲड. वसंतराव मनकर यांचे हस्ते व प्रमुख पाहुणे, शिवचरित्राचे अभ्यासक मा. दादा नेवे यांचे उपस्थितीत विद्यार्थी मंडळाचे उद्‌घाटन झाले. या प्रसंगी दिलीप जोशी यांचे छत्रपती शिवाजी राजे यांचे चरित्रपर पोवाडा तसेच चित्रकार योगेश सुतार यांचे छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र सादरीकरण झाले.

स्वामी विवेकानंद जयंती निमित्त मा. दीपक केसकर यांचे व्याख्यान झाले. महाराष्ट्र शासन अहमदनगर पाणी-पुरवठा स्वच्छता विभाग व जिल्हा परिषद अहमदनगर यांच्या वतीने आयोजित तालुका स्तर वक्तृत्व स्पर्धा कु. राक्षे ज्योती व कु. आवारी पूनम यांची अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकाचे पुरस्कार पटकावले. ॲटाक्झीया आजाराने ग्रस्त माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी ह.भ.प. सचिन देशमुख व बहिण पूनम देशमुख यांना रु. ६५००/- मदत देऊन सामाजिक बांधिलकी जपली.

वार्षिक स्नेहसम्मेलनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध उपक्रम व स्पर्धेत कु. शुभांगी चौधरी, कु. ज्योती राक्षे, कु. पल्लवी पुंडे व जयेश मंडलीक यशस्वी झाले.

## क्रीडा व शारीरिक शिक्षण विभाग :

**क्रीडा समिती**

**अध्यक्ष : प्राचार्य रमेशचंद्र खांडगे**

**कार्यकारी अध्यक्ष : प्रा. नंदलाल काळण**

**सदस्य : प्रा. योगेश उगले, प्रा. सोपान कोरडे, प्रा. शिरीश डावखर, प्रा. गंगाराम साबळे, प्रा. संगीता शेळके,**

**जिमखाना प्रतिनिधी** : कु. प्रेरणा बाबुराव एखंडे सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात विविध खेळांचे संघ तयार करून तालुका, जिल्हा विभाग राज्य व राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धांसाठी पाठविण्यात आले.

**१. नेट बॉल** : जिल्हास्तरीय शालेय नेट बॉल स्पर्धा दिनांक १३ ते १४ ऑगस्ट २०१४ रोजी सराफ विद्यालय व डॉ. देवेंद्र ओहरा ज्यु. कॉलेज, संगमनेर येथे पार पडल्या. या जिल्हास्तरीय स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या मुले व मुली या दोन्ही संघांनी विजेतेपद पटकाविले. जिल्हास्तरीय नेट बॉल स्पर्धेत विजयी झालेल्या दोन्ही संघांचे जिल्ह्यातर्फे पुणे विभागीय स्पर्धेत निवड झाली.

पुणे विभागीय नेट-बॉल स्पर्धा दिनांक २३ व २४ ऑक्टोबर २०१३ रोजी सोलापूर येथे पार पडल्या या स्पर्धेत महाविद्यालयाचे मुले व मुली या दोन्ही संघांनी उपविजेतेपद पटकाविले.

पुणे विभागीय स्पर्धेत उपविजयी झालेल्या संघातील खेळाडू पुढीलप्रमाणे -

**मुले** : १) शेख अबूरीहान मुश्ताक, २) भालेराव ऋषिकेश आनंद, ३) धुमाळ शुभम विनायक, ४) नवले विनोद रमेश, ५) धुमाळ राहुल राजेंद्र, ६) उंबरे ऋषिकेश सुभाष, ७) भिंगारे सोमेश मारुती, ८) घुले शुभम राधाकिसन, ९) कोळपकर शुभम अनिल, १०) शेटे संकेतकुमार साईनाथ, ११) साबळे शुभम भरत, १२) माने आदित्य घनश्याम.

**मुली** : १) कु. घुले पल्लवी राधाकिसन, २) कु. एखंडे प्रेरणा बाबुराव, ३) कु. नवले तेजश्री राजेंद्र, ४) कु. गायकवाड तेजस्वीनी अशोक, ५) कु. फापाळे प्रियंका ठकसेन, ६) कु. नागरे श्रद्धा शशिकांत, ७) कु. डोंगर श्वरी अजय, ८) कु. बनकर पल्लवी गणपत, ९) कु. राक्षे ज्योती बाळासाहेब, १०) कु. धुमाळ ज्योती रामदास, ११) कु. सोनवणे पल्लवी रोहिदास

पुणे विभागीय नेटबॉल स्पर्धेतून राज्यस्तरीय निवड चाचणी स्पर्धेसाठी शेख अबूरिहान मुश्ताक व कु. घुले पल्लवी राधाकिसन यांची निवड झाली. राज्यस्तरीय स्पर्धा गोंदीया येथे पार पडल्या.

**२. खो-खो**: तालुकास्तरीय खो-खो स्पर्धा दि. १६ ते १८ ऑगस्ट २०१३ रोजी अगस्ति विद्यालय, अकोले येथे पार पाडल्या. या स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने विजेतेपद पटकाविले व या संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या संघातील खेळाडू पुढील प्रमाणे -

१) शेटे संकेतकुमार साईनाथ, २) धुमाळ राहुल राजेंद्र, ३) कु. मुलाणी तौसिफ शाहाजान, ४) झोळेकर भूषण दादाभाऊ, ५) आरोटे विशाल दत्तात्रय, ६) शिंदे मंगेश दिनकर, ७) पानसरे अक्षय देविदास, ८. देशमुख आकाश बाळासाहेब, ९) देशमुख आकाश बाळासाहेब, १०) लोहरे संदिप काशिनाथ लोहरे प्रवीण देवराम, ११) लोहरे प्रवीण देवराम, १२) शिंदे निलेश अशोक

जिल्हास्तरीय खो-खो स्पर्धा दि. १६ व १७ ऑगस्ट २०१३ रोजी पार पडल्या. यामध्ये संघ सहभाबी झाला.

**३. क्रिकेट** : जिल्हास्तरीय शालेय क्रिकेट स्पर्धा दि. ४६ १७ ऑगस्ट २०१३ रोजी जंगली महाराज आश्रम विद्यालय, कोकमठाण ता. कोपरगांव येथे पार पडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचा पुढील संघ सहभागी झाला.

१) भालेराव ऋषिकेश आनंद, २) वाकचौरे आशिष भगवान, ३) धुमाळ शुभम विनायक, ४) शेख शाहिल अमर, ५) पवार अजय संजय, ६) शेख अबूरिहान मुश्ताक, ७) चौधरी अनिकेत शरद, ८) हुलवळे पराग आनंदा, ९) नवले सुजित पोपट, १०) शेख अरबाज सलिम, ११) माळवे विक्रांत बाळासाहेब, १२) मोहिते प्रशांत मोहन

**३. ॲक्रोबेटिक्स (जिम्नस्टिक्स)** : जिल्हास्तरीय शालेय ॲक्रोबेटिक्स स्पर्धा तालुका क्रीडा संकूल, संगमनेर येथे दि. १७ ऑगस्ट २०१३ रोजी पार पडल्या. या स्पर्धेतून पुणे विभागीय स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयाच्या पुढील खेळाडुंची निवड झाली. १) कु. पूजा रमेश चौधरी, २) कु. अश्विनी सोमनाथ काळे

पुणे विभागीय शालेय ॲक्रोबेटिक्स स्पर्धा पुणे येथे दि. १० व ११ ऑक्टोबर २०१३ रोजी पार पडल्या या स्पर्धेत आपल्या खेळाडूंनी तृतीय क्रमांक मिळविला. तसेच अहमदनगर जिल्हा ॲक्रोबेटिक्स असोसिएन तर्फे अहमदनगर जिल्हा संघाची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. त्यामध्ये आपल्या दोन खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड करण्यात आली. त्या मध्ये आपल्या दोन खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अहमदनगर संघात निवड झाली. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू - १) कु. अश्विनी सोमनाथ काळे, २) कु. प्रगती प्रकाश नाईकवाडी

राज्यस्तरीय ॲक्रोबेटिक्स स्पर्धा श्री. शिवाजी छत्रपती स्टेडियम जळगांव येथे पार पडल्या. यामध्ये आपल्या खेळाडू सहभागी झाल्या. कु. अश्विनी काळे हिने डायनामिक प्रकारात ब्रांझपदक पटकावले.

**५. कबड्डी** : तालुकास्तरीय शालेय कबड्डी स्पर्धा दि. १९ व २० ऑगस्ट २०१३ रोजी अगस्ति विद्यालय, अकोले येथे पारं पडल्या या स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाच्या मुलांच्या संघाने विजेतेपद पटकाविले व या संघाची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेला संघ पुढील प्रमाणे –

१) मोहिते दीपक दत्तात्रय, २) वर्पे विशाल बाळासाहेब, ३) कर्णिक मोहन शरद, ४) कानवडे अक्षय बाळासाहेब, ५) अत्तार तौसिफ चाँदसाब, ६) गोफणे अक्षय भास्कर, ७) मुळे शुभम बाळासाहेब, ८) कानवडे युवराज भाऊसाहेब, ९) नाईकवाडी अक्षय नंदू, १०) शिंदे मारुती पाटील, ११) नाईकवाडी सुमित सूर्यभान, १२) सोनवणे सिद्धार्थ बाळू

जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा दि. २९ व ३० ऑगस्ट २०१३ रोजी कळस ता. अकोले येथे पार पडल्या यात आपला संघ सहभागी झाला.

**६. बुद्धीबळ** : जिल्हास्तरीय बुद्धीबळ स्पर्धा जिल्हा क्रीडा संकूल अहमदनगर येथे दि. २१ व २२ ऑगस्ट २०१३ रोजी पार पडल्या. या स्पर्धेमध्ये आपल्या महाविद्यालयाचे मुले व मुली हे दोन्ही संघ सहभागी झाले. या संघातील खेळाडू पुढील प्रमाणे : **मुले –** १) देशमुख प्रशांत सुनिल, २) भांगरे सोमनाथ विजय, ३) जगताप संकेत ललित, ४) आवारी अक्षय जयदेव. **मुली –**: कु. धादवड ज्ञानेश्वरी दिलीप, २) कु. चौधरी योगिता काशिनाथ, ३) कु. कराळे दिप्ती जालिंदर

**७. बॅडमिन्टन** : जिल्हास्तरीय बॅडमिन्टन स्पर्धा दि. २७ व २९ ऑगस्ट २०१३ रोजी जिल्हा क्रीडा संकुल, अहमदनगर येथे पार पडल्या. या मध्ये आपल्या महाविद्यालयाचे मुले व मुली हे दोन्ही संघ सहभागी झाले. जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागी झालेला संघ पुढील प्रमाणे : **मुले –** १) विसपुते सौरभ आनंदा, २) कडलग शुभम शरद, ३) सय्यद साहील सादिक, ४) वैराट अक्षय रविंद्र. **मुली –** १) कु. कराळे दिप्ती जालिंदर, २) कु. आरोटे प्रतिभा राजेश, ३) कु. वाकचौरे पल्लवी भानुदास

**८. सॉफ्टबॉल** : जिल्हास्तरीय शालेय सॉफ्टबॉल स्पर्धा अभिनव पब्लिक स्कूल, अकोले येथे पार पडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचा पुढील संघ सहभागी झाला. : १) नवले विनोद रमेश, २) दाते सागर सखाहरी, ३) शेख अबुरिहान मुश्ताक, ४) सातपेळी साईकृष्ण रामचंद्र, ५) धुमाळ शुभम विनायक, ६) भालेराव ऋषिकेश सुभाष, ७) उंबरे ऋषिकेश सुभाष, ८) धुमाळ राहुल राजेंद्र, ९) यादव राजकुमार कैलाशनाथ, १०) घुले शुभम राधाकिसन, ११) नवले ऋषिकेश सुधाकर, १२) सहाणे ऋषिकेश ज्ञानेश्वर, १३) मुलाणी तौसिफ शहाजान, १४) शेटे संकेत साईनाथ, १५) वाकचौरे गणेश बाळासाहेब, १६) साबळे शुभम भरत

**९. कुस्ती** : तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा ॲड. मनोहरराव देशमुख महाविद्यालय राजूर येथे दि. ४ सप्टेंबर २०१३ रोजी पार पडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयातील खेळाडू वर्पे विशाल बाळासाहेब याने प्रथम क्रमांक मिळविलाा व त्याची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धा दि. २१ सप्टेंबर २०१३ रोजी अहमदनगर येथे पार पडल्या यामध्ये आपला खेळाडू सहभागी

झाला.

**१०. थ्रो-बॉल** : जिल्हास्तरीय थ्रॉ-बॉल स्पर्धा जंगली महाराज आश्रमविद्यालय, कोकमठाण, ता. कोपरगांव येथे दि. १० व ११ सप्टेंबर २०१३ रोजी पार पाडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचा पुढील संघ सहभागी झाला. १) भांगरे संतोष सुधाकर, २) वाकचौरे ऋषिकेश संजय, ३) वाकचौरे अक्षय अरुण, ४) वाळुंज अक्षय नवनाथ, ५) शेख अबूरिहान मुश्ताक, ६) खांडगे अमोल, ७) धुमाळ शुभम विनायक, ८) वाकचौरे स्वप्निल गौतम, ९) भालेराव ऋषिकेश आनंद, १०) नवले विनोद रमेश, ११) वाकचौरे गणेश बाळासाहेब, १२) चौधरी अनिकेत.

**११. डॉजबॉल** – जिल्हास्तरीय डॉजबॉल स्पर्धा जिल्हा क्रीडा संकूल अहमदनगर येथे दि. ७ सप्टेंबर २०१३ रोजी पार पडल्या यामध्ये आपल्या महाविद्यालयाचा पुढील संघ सहभागी झाला.

१) नवले महेश दिनकर, २) पवार अजय संजय, ३) झोळेकर भूषण दादाभाऊ, ४) नवले ऋषिकेश सुधाकर, ५) साबळे शुभम भरत, ६) धुमाळ राहुल राजेंद्र, ७) यादव राजकुमार कैलासनाथ, ८) शेटे संकेत साईनाथ, ९) खांडगे अमोल, १०) मुलाणी तौसिफ शहाजान

**१२. ॲथलेटिक्स (मैदानी स्पर्धा)** : तालुकास्तरीय मैदानी स्पर्धा अकोले महाविद्यालय येथे दि. २७ व २८ सप्टेंबर २०१३ रोजी पार पडल्या. या स्पर्धेतून अकोले तालुक्यातर्फे जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी आपल्या महाविद्यालयाच्या पुढील खेळाडूंची निवड झाली.

१) कु. ज्योती बाळासाहेब राक्षे – भालेफेक, गोळाफेक

२) कु. करुणा राधाकिसन सोनवणे – १०० मी. धावणे, ४ X १०० मी रिले

३) कु. शितल सुनिल मुंढे – ४ X १०० मी रिले

४) कु. प्रशाली सुभाष वाकचौरे – ४ X १०० मी रिले

५) कु. कविता अशोक कानवडे – २०० मी धावणे, ४ X १०० मी व ४ X ४०० मी रिले

६) कु. ज्योती लक्ष्मण घोडके – ८०० मी धावणे, ४ X ४०० मी रिले

७) कु. वैशाली भरत वामन – ४ X ४०० मी रिले

८) कु. अश्विनी जगन्नाथ पुंडे – ४ X ४०० मी रिले

९) कु. अस्मिता राजेंद्र डावरे – तिहेरी उडी

१०) मोहीते दिपक दत्तात्रय – लांब उडी, ऊंच उडी

११) फरगडे मयुर अरुण – गोळा फेक

१२) धुमाळ राहुल राजेंद्र – १०० मी धावणे

१३) सांगळे राहुल धोंडीबा – १५०० मी व ५०० मी. धावणे.

जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स स्पर्धा जिल्हा संकुल अहमदनगर येथे दि. १० ऑक्टोबर २०१३ रोजी पार पडल्या यामध्ये आपले खेळाडू सहभागी झाले.

**१३. रोप मल्लखांब –**

जिल्हास्तरीय शालेय रोप मल्लखांब स्पर्धा महर्षि ग.ज. चितांबर कन्या विद्यालय, अहमदनगर येथे दि. २७ व २८ सप्टेंबर २०१३ रोजी पार पडल्या यामध्ये आपल्या महाविद्यालयाच्या खेळाडूंनी पुढील प्रमाणे यश संपादन केले. : १) कु. पूजा रमेश चौधरी – प्रथम क्रमांक, २) कु. अश्विनी सोमनाथ काळे – द्वितीय क्रमांक, ३) कु. प्रगती प्रकाश नाईकवाडी – तृतीय क्रमांक

जिल्हास्तरीय शालेय स्पर्धेतून पुणे विभागीय स्पर्धेसाठी वरील तिन्ही खेळाडूची अहमदनगर जिल्ह्यातर्फे निवड झाली.

पुणे विभागीय रोप मल्लखांब स्पर्धा दि. १६ व १८ नोव्हेंबर २०१३ रोजी अहमदनगर येथे पार पडल्या यामध्ये आपल्या खेळाडू सहभागी झाल्या. तसेच अहमदनगर जिल्हा मल्लखांब असोसिएशनच्या वतीने अहमदनगर येथे झालेल्या जिल्हा निवड चाचणी स्पर्धेतून आपल्या महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा संघात निवड झाली. त्या खेळाडू पुढील प्रमाणे. – १) कु. अश्विनी सोमनाथ काळे, २) कु. प्रगती प्रकाश नाईकवाडी

राज्यस्तरीय रोप मल्लखांब स्पर्धा सैनिकी स्कूल नंदुरबार येथे पार पडल्या. यामध्ये आपल्या खेळाडू सहभागी झाल्या.

**१४. हॅन्डबॉल**: जिल्हास्तरीय शालेय हॅन्डबॉल स्पर्धा १२ सप्टेंबर २०१३ तालुका क्रीडा संकूल, संगमनेर येथे पार पडल्या. यामध्ये आपल्या महाविद्यालयाच्या मुलींच्या संघाने विजेतेपद पटकाविले तर मुलांच्या संघाला तृतीय क्रमांक मिळाला. जिल्हास्तरीय स्पर्धेत विजयी झालेल्या मुलींच्या व तृतीय क्रमांक मिळविलेल्या मुलांच्या संघातील खेळाडू पुढील प्रमाणे.

**मुली** – १) घुले पल्लवी राधाकिसन, २) एखंडे प्रेरणा बाबुराव, ३) नवले तेजश्री राजेंद्र, ४) गायकवाड तेजस्वीनी अशोक, ५) फापाळे प्रियंका ठकसेन, ६) नागरे श्रद्धा शशिकांत, ७) डोंगरे श्वरी अजय, ८) बनकर पल्लवी गणपत, ९) कराळे दिप्ती जालींदर, १०) धुमाळ ज्योती रामदास, ११) सोनवणे पल्लवी रोहिदास

**मुले** – १) शेख अबूरिहान मुश्ताक, २) भवारी राहुल रघुनाथ, ३) नवले विनोद रमेश, ४) धुमाळ शुभम विनायक, ५) मेंगाळ भूषण विठ्ठल, ६) भांगरे अजित श्रावण, ७) भालेराव ऋषिकेश

आनंद, ८) शेख साहील उमर, ९) यादव राजकुमार कैलाशनाथ, १०) शेटे संकेतकुमार साईनाथ, ११) साबळे शुभम भरत, १२) वर्पे विशाल बाळासाहेब, १३) मुलाणी तौसिफ शहाजान

जिल्हास्तरीय हॅन्डबॉल स्पर्धेतून मुलींच्या संघाची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तर मुलांच्या संघातील दोन खेळाडूंची पुणे विभागीय निवड चाचणी स्पर्धेसाठी निवड झाली. – १) शेख अबूरिहान मुश्ताक, २) धुमाळ शुभम विनायक

पुणे विभागीय शालेय हॅन्डबॉल स्पर्धा राजीव गांधी मैदान, सोलापूर येथे दि. ९ व १० ऑक्टोबर २०१३ रोजी पार पडल्या या पुणे विभागीय स्पर्धेमध्ये आपल्या मुलींच्या संघाने विजेतेपद पटकाविले व आपल्या मुलींच्या संघाची पुणे विभागातर्फे राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली.

राज्यस्तरीय शालेय हॅन्डबॉल स्पर्धा जिल्हा क्रीडा संकूल लातुर येथे दि. २६ ते २८ ऑक्टोबर २०१३ रोजी पार पडल्या या स्पर्धेतून महाराष्ट्र संघातून आपल्या महाविद्यालयाच्या घुले पल्लवी राधाकिसन हिची निवड झाली.

**१५. टग ऑफ वार – (रस्सीखेच)** : जिल्हास्तरीय शालेय टग ऑफ वार स्पर्धा तालुका क्रीडा संकूल संगमनेर येथे पार पडल्या. या स्पर्धेत आपला पुढील संघ सहभागी झाला. – १) पाडेकर अक्षय शांताराम, २) लोखंडे सनी राजेश, ३) धुमाळ राहुल राजेंद्र, ४) वाकचौरे स्वप्निल गौतम, ५) नाईकवाडी दिनेश राजेंद्र, ६) मेंगाळ भूषण विनायक, ७) शेख अबूरिहान मुश्ताक, ८) धुमाळ शुभम विनायक, ९) मंडलिक सतिश विठ्ठल

जिल्हास्तरीय टग ऑफ वार स्पर्धेतून पुणे विभागीय निवड चाचणी स्पर्धेसाठी पाडेकर अक्षय शांताराम याची निवड करण्यात आली. राज्यस्तरीय टग ऑफ वार स्पर्धा फलटण, जि. सातारा येथे दि. १४ व १५ डिसेंबर २०१३ रोजी पार पडल्या यामध्ये आपला खेळाडू सहभागी झाला. तसेच अहमदनगर जिल्हा टग ऑफ वार असोशिएशनच्या वतीने राज्यस्तरीय टग ऑफ वार स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या अहमदनगर जिल्हा संघात आपल्या महाविद्यालयाच्या तीन खेळाडूंची निवड झाली. राज्यस्तरीय संघात निवड झालेल्या खेळाडू १) कु. एखंडे प्रेरणा बाबुराव, २) कु. नागरे श्रद्धा शशिकांत, ३) कु. फापाळे प्रियंका ठकसेन

राज्यस्तरीय टग ऑफ वार स्पर्धा विभागीय क्रीडा संकूल नाशिक येथे दि. ८ ते १० ऑगस्ट २०१३ रोजी पार पडल्या यामध्ये अहमदनगर जिल्हा संघाने ४४० कि. ग्रॅ. वजन गटात रौप्यपदक पटकाविले. त्या मध्ये आपल्या महाविद्यालयाच्या कु. फापाळे प्रियंका ठकसेन या खेळाडूचा समावेश होता.

**१६. टेनिकॉईट (रिंगटेनिस) –** अहमदनगर जिल्हा टेनिकॉईट असोशिउशन तर्फे राज्यस्तरीय टेनिकॉईट स्पर्धेसाठी अहदमनगर जिल्हा संघाची निवड चाचणी स्पर्धा तालुका क्रीडा संकूल संगमनेर येथे घेण्यात आली. या स्पर्धेतून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी अहमदनगर जिल्हा संघाची निवड करण्यात आली. या अहमदनगर जिल्हा संघात आपल्या महाविद्यालयाच्या दोन खेळाडूंची निवड झाली. – १) भिंगारे सोमेश मारुती, २) चांडे प्रशांत उत्तम

राज्यस्तरीय टेनिकॉईट चॅम्पियन स्पर्धा औरंगाबाद येथे दि. ६ ते ८ डिसेंबर २०१३ रोजी पार पडल्या. यामध्ये आपले खेळाडू सहभागी झाले.

**वार्षिक क्रीडा स्पर्धा** : सालाबादप्रमाणे याही वर्षी वार्षिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले.

क्रीडा विभागाचे कामकाज करीत असताना वर्षभरात महाविद्यालयाचे प्राचार्य रमेशचंद्र खांडगे, उपप्राचार्य, प्रा. आत्माराम काळे, पर्यवेक्षक प्रा. गणपत हासे, क्रीडा विभाग समिती सदस्य, सर्व प्राध्यापक वर्ग, महाविद्यालयीन कर्मचारी वर्ग यांचे विशेष सहकार्य लाभले तसेच गावातील सर्वांचे क्रीडाविभाग सदैव ऋणी राहील.

## कला मंडळ :

### अध्यक्ष : प्रा. शावरसिद्ध बिराजदार

मंडळचे उद्‌घाटन दि. २३ सप्टेंबर २०१३ रोजी गझलकार प्रदीप निफाडकर यांच्या हस्ते व संस्थेचे खजिनदार मा.अॅड.के.बी. हांडे यांच्या अध्यक्षतेखाली झाले. श्री दत्त प्रतिष्ठान अकोले आयोजित नृत्य स्पर्धेत कु. वृशाली गणपत पवार व आदित्य पवनकुमार टाकवाल या विद्यार्थ्यांनी अनुक्रमे प्रथम व द्वितीय क्रमांकाचे पुरस्कार प्राप्त केले. शैक्षणिक वर्षात विविध उपक्रम, स्पर्धा घेण्यात आल्या. वार्षिक स्नेहसंमेलना निर्मित्त झालेल्या मराठी, हिंदी, गीतगायन, नृत्य स्पर्धातून कोमल वाघमारे, प्रगती नाईकवाडी सुमीत जोशी, सुवर्णा कोटकर, वैभव चौधरी, वृषाली पवार, आश्विनी काळे, हेमाली हांडे ऋषिकेश धोक्रट, ऋषिकेश वाळुंज, सोनाली देशमुख काजल गायकवाड विजयी ठरले.

## राष्ट्रीय सेवा योजना (+२ स्तर)

### कार्यक्रम अधिकारी : प्रा. गणपत नवले

शैक्षणिक वर्षात योजनेसाठी १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. महाविद्यालयातील परिसर स्वच्छतेसह विविध

उपक्रम घेण्यात आले. २० ऑगस्ट २०१३ रोजी अगस्ति आश्रम येथे एक दिवसीय शिबीर घेण्यात आले. रा.से.योजनेच्या वर्धापन दिनानिमित्त २४ ऑगस्ट २०१३ रोजी ह.भ.प. दीपक महाराज देशमुख यांचे अध्यात्म व संस्कार या विषयावरील व्याख्यान तसेच १६ ऑक्टोबर २०१३ रोजी मोराची चिंचोली, राळेगण सिद्धी, हिवरेबाजार या आदर्श गावांना ४५ स्वसंसेवकांचे अभ्यास सहलीचे आयोजन हे उपक्रम घेण्यात आले. दि. ६ जानेवारी ते १२ जानेवारी २०१४ या काळात अगस्ति आश्रम, अकोले येथे विशेष हिवाळी शिबीर संपन्न झाले. आदर्श गटनायक म्हणून कु. तेजस्विनी कोल्हाळ, अनिकेत वाकचौरे, तुषार सदाकाळ, अनिकेत वाळुंज, सोमेश भिंगारे, कु. आश्विनी काळे तसेच उत्कृष्ठ स्वयंसेवक म्हणून कु. सुवर्णा नाईकवाडी, योगेश चव्हाणके व कांचन कर्पे यांची निवड झाली. शिबीराकरिता प्रा. महेश उगले, प्रा. बाळासाहेब गोर्डे, प्रा.सौ. अंजना नवले, यांचेही सहकार्य लाभले. संस्थेचे अध्यक्ष, सेक्रेटरी, पदाधिकारी, प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक यांच्या प्रेरणा व दिशा मोलाच्या ठरल्या.

## वादविवाद मंडळ

**अध्यक्ष : ओंकार राठी**

जीवदया प्रतिष्ठान, निंब्रळ व अकोले तालुका मराठी अध्यापक मंडळाच्या वतीने झालेल्या गो.नी. दांडेकर स्मृती तालुकास्तरीय वक्तृत्व स्पर्धेत ज्योती राक्षे हिने तृतीय पारितोषिक प्राप्त केले. श्रीरामपूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेस आयोजित, शरदचंद्र पवार यांच्या वाढदिवसा निमित्त जिल्हा स्तरीय स्पर्धेत सहभागी झाले. वार्षिक स्नेहसम्मेलन वक्तृत्व व वादविवाद स्पर्धेत अर्चना आढाव, ज्योती राक्षे, सुविधा पुंडे या विद्यार्थ्यांनी पोरितोषिक प्राप्त केले. विविध स्पर्धेसाठी प्रा. तानाजी जाधव, प्रा. बाळासाहेब शेटे, प्रा. अशोक कडलग, प्रा. विवेक वाकचौरे यांनी सहकार्य केले.

## परीक्षा विभाग

**— अध्यक्ष : प्रा. बी.एस. शेवाळे**

चाचणी, गृहपाठ, सहामाही, सराव, प्रात्यक्षिक, तोंडी, परीक्षांचे यथोचि, सूत्रबद्ध नियोजन करण्यात आले. प्रा. बी.पी. शेटे, प्रा. एस्. बी. काळे, प्रा. एस्. जी. बिबवे, प्रा. एम्. व्ही. पाडेकर, प्रा.श्रीमती आर.बी.डावरे, प्रा. एम्.बी. शिंदे यांनी विभागीय परीश्रम घेतले.

## सहल विभाग

**अध्यक्ष : प्रा. डी. एम्. वाकळे**

पुणे, सातारा, कोल्हापूर व कोकण दर्शन घडविणाऱ्या दोन स्वतंत्र सहली करिता प्रा. एस.ई. मालुंजकर, प्रा. सचिन चासकर, प्रा. आर. एम. कानवडे, श्रीमती एम. बी. शिंदे, प्रा. रेखा घुले, प्रा. व्ही. एम. निमसे, सौ. नवले, कु. भोर या प्राध्यापक वर्गाचे सहकार्य व मार्गदर्शन लाभले.

## प्रवेश परीक्षा (CET) व उन्हाळी वर्ग (Vacation) समिती

**प्रा. चांगदेव डोंगरे, प्रा. भिमाजी पळसकर, प्रा. संभाजी गायकवाड**

**उन्हाळी वर्ग** (Vacation) : अगस्ति पॅटर्नचे आयोजन करण्यात आले. दि. १३ एप्रिल २०१३ पासून १२ वी विज्ञान वर्गांच्या उन्हाळी वर्गांचे आयोजन करण्यात आले. 'सीबीएसई' धोरणांनुसार उच्चीकृत केलेल्या अभ्यासक्रमाचे योग्य नियोजन करून डिसेंबर २०१३ पर्यंत अभ्यासक्रम शिकवून पूर्ण केला. कॉलेजच्या परिक्षांव्यतिरिक्त इतर सराव परीक्षा घेऊन पालकांना व विद्यार्थ्यांना निकालाची जाणीव करून दिली. प्रत्येक परीक्षेचे निकाल पालकांना प्रत्यक्ष दाखवून मार्गदर्शन केले. जानेवारी मध्ये अभ्यासक्रमाची रिव्हीजन घेऊन गुणवत्तावाढीसाठी मार्गदर्शन केले.

१) इ. १२ वी विज्ञान वर्गाच्या विद्यार्थ्यांच्या पालकांचा मेळावा सप्टेंबर महिन्यात आयोजित करण्यात आला.

२) ऑक्टोबर महिन्यामध्ये संस्था पदाधिकारी प्राचार्य, उपप्राचार्य, पर्यवेक्षक यांच्या उपस्थितीमध्ये इ. ११ वी विज्ञान वर्गांच्या विद्यार्थ्यांच्या पालक मेळाव्याचे आयोजन.

३) २२/१२/२०१३ रोजी पुणे येथील 'आयआयबीएम कॉलेज ऑफ हॉटेल मॅनेजमेंट' डॉ. सुनिता यांचे 'हॉटेल मॅनेजमेंट अ‍ॅण्ड टुरीझम' या मधील संधी यावर के.बी. दादा सभागृह मध्ये १२ वी च्या सर्व विद्यार्थ्यांसाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले.

४) दि. १७/०१/२०१३ रोजी 'इंजिनियरींग' प्रवेश प्रक्रिया यावर आधारित प्राचार्यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

५) संदिप फाऊंडेशन नाशिक यांचे तर्फे १२ वी च्या विद्यार्थ्यांसाठी मोफत 'टॅलेंट हंट रिसर्च एक्झाम २०१३' चे 'जेईई' साठी सराव परीक्षेचे आयोजन केले.

**प्रवेश परीक्षा (सेट) अहवाल**

मेडीकल व इंजिनिअरींगसाठी आवश्यक असणारी अनुक्रमे MH-CET व JEE (Main) या परीक्षांबाबत सर्व माहिती प्रवेश अर्ज On line भरण्यापासून ते परीक्षा, प्रत्यक्ष प्रवेश या संदर्भात मार्गदर्शन केले जाते. मे. २०१३ मध्ये झालेल्या MH-

CET व NEET (Main) या परीक्षेस महाविद्यालयातून २४५ विद्यार्थी बसले पैकी १२५ नियमित कोर्सला होते. १) प्रथम क्रमांक : वाकचौरे वैभव शांताराम PCM (१४८/२००), २) द्वितीय क्रमांक : वैद्य चेतन अनंत PCM (१०२/२००),

सर्वच विद्यार्थ्यांना चांगल्या महाविद्यालयामध्ये (शासकीय/खाजगी) प्रवेश मिळाले आहेत. व मेडीकल इंजिनिअरींग यशस्वी परंपरा पुढे चालू आहे.

पुणे येथील DEEPER ही संस्था विद्यार्थ्यांना या परीक्षा चांगल्या पद्धतीने देता याव्यात म्हणून प्रयत्न व संशोधन करते. महाराष्ट्र शासनाच्या 'सी.बी.एस.ई' च्या धर्तीवर होणाऱ्या 'एमएच-सेट' व 'जेईई' या परीक्षांचे आयोजन कले जाते. यावर्षी ५ जानेवारी २०१४ 'सेट' व 'जेईई' यशस्वी आयोजन केले होते. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचे १०५ विद्यार्थ्यांनी ही सराव परीक्षा दिली. यानंतर ३० मार्च २०१४ रोजी पुन्हा एकदा अशा प्रकारची परीक्षा होणार आहे. 'डीपर' तर्फे ई ११ वी साठी 'आरंभ-१४' या परीक्षेचे आयोजन ३० मार्च २०१४ रोजी केलेले आहे. आपल्या महाविद्यालयातील १३० विद्यार्थी सदर परीक्षा देणार आहेत. 'डीपर' परीक्षा दिल्यामुळे विद्यार्थी अंतिम परीक्षा तणावमुक्त पद्धतीने देतो, सराव झाल्यामुळे इतर अडचणी येत नाही. निकाल लागल्यानंतर त्याचे योग्य ते पृथःकरण केले जाते.

'सेट' विभागामार्फत सर्व परीक्षांची माहिती वेळोवेळी दिली जाते व सर्व 'ऑनलाईन' प्रक्रिया मोफत महाविद्यालयामध्ये राबविली जाते. निकाल लागल्यानंतरची प्रवेश मिळेपर्यंत सर्व माहिती प्रा. विवेक वाकचौरे देत असतात. यावर्षी देखील महाविद्यालयामध्ये 'सेट' कोर्सचे आयोजन करण्यात आले आहे. एकूण १८ विद्यार्थी नियमित मार्गदर्शन वर्गाचा लाभ घेत आहेत. बोर्ड परीक्षा संपल्यानंतर पूर्ण वेळ मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केलेले आहे.

वरील सर्व उपक्रमांमध्ये प्रा.गोर्डे, प्रा.लांडगे, प्रा. कर्पे, प्रा.उगले, प्रा. डावखर, प्रा.शिंदे, प्रा.बिबवे, प्रा.जाधव, प्रा.कोरडे, प्रा.मनिषा घोलप, प्रा.अंजली नवले, प्रा.देशमुख यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

## विज्ञान मंडळ

**अध्यक्ष : प्रा. महेश उगले**

मंडळाच्या वतीने निबंध लेखन, विज्ञान बुद्धीमत्ता चाचणी स्पर्धा घेण्यात आल्या. विज्ञान विषयक लेखांचे वाचन, भित्तीपत्रके प्रदर्शन हे उपक्रम घेण्यात आले. विविध स्पर्धांतील बक्षिसप्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे. - १) आदित्य टांकवाल, २) शितल सावंत, ३) श्रद्धा भांगरे, ४) अर्चना आढाव, ५) शुभम वाडगे, ६) रोहम वाकळे, ७) प्रणव पवार, ८) प्रमिला मुठे

सदस्य - प्रा.डॉ.एस.डी.शिंदे व प्रा. भूषण जाधव यांचे विशेष मार्गदर्शन सहकार्य लाभले.

## नियतकालिक विभाग

**प्रा.डॉ. सुनील शिंदे**

नियतकालिक विभागाचे कार्य साहित्य संकलनासह प्रगतीपथावर आहे. प्रा.जी.डी. लांडगे, प्रा. रोहिणी डावरे यांचे मोलाचे सहकार्य, मार्गदर्शन लाभले.

## ग्राहक भांडार

**अध्यक्ष : प्रा. बी.पी. शेटे**

महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी आवश्यक असणारी सर्व प्रकारची स्टेशनरी व पूरक साहित्य 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर उपलब्ध करून देण्याचे काम विद्यार्थी ग्राहक भांडार सन १९७७ पासून करत आहे. मा.प्राचार्य रमेशचंद्र खांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली या ग्राहक भांडाराचे वैभव दिवसें-दिवस वाढत असून मा.प्राचार्यांच्या संकल्पनेतून महाविद्यालयीन विद्यार्थिनींचे हिमोग्लोबिनचे प्रमाण संतुलित ठेवण्याच्या हेतूने या वर्षापासून लोणावळा चिक्की उपलब्ध केली आहे. याकामी सर्व संचालक, सेक्रेटरी आणि सभासदांचे सहकार्य लाभत आहे. त्यामुळेच ऑडीट 'अ' वर्ग मिळाला आहे.

## वेळापत्रक समिती

**अध्यक्ष : भिमाजी पळसकर**

तीन ही शाखांचे वेळापत्रक, नियमानुसार व सुत्रबद्ध पद्धतीने तयार करण्यात आले. प्रा. संजय लांडगे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## पर्यावरण प्रकल्प विभाग

**अध्यक्ष : प्रा. कानवडे आर.एम.**

प्रकल्पांची पूर्तता करून पश्चिम घाट विकास कार्यक्रमांतर्गत इको स्थापना, मा. सतीश आवटे यांचे गावठी वाण या विषयावरील व्याख्यान, कळसुबाई येथे आयोजित विद्यार्थी शिबीर, जैवविविधता, जलसंवर्धन या संदर्भातील अभ्यास परिचय हे उपक्रम घेण्यात आले. कळसुबाई शिखराची उंची मोजण्याच्या विशेष उपक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग हे वैशिष्ट्यपूर्ण काम विभागातर्फे पार पडले. वृत्तपत्रिय प्रसारमाध्यमांनी विशेष दखल घेऊन या कार्यास खास प्रसिद्धी दिली.

## सामाजिक समता मंडळ

CET व NEET (Main) या परीक्षेस महाविद्यालयातून २४५ विद्यार्थी बसले पैकी १२५ नियमित कोर्सला होते. १) प्रथम क्रमांक : वाकचौरे वैभव शांताराम PCM (१४८/२००), २) द्वितीय क्रमांक : वैद्य चेतन अनंत PCM (१०२/२००),

सर्वच विद्यार्थ्यांना चांगल्या महाविद्यालयामध्ये (शासकीय/खाजगी) प्रवेश मिळाले आहेत. व मेडीकल इंजिनिअरींग यशस्वी परंपरा पुढे चालू आहे.

पुणे येथील DEEPER ही संस्था विद्यार्थ्यांना या परीक्षा चांगल्या पद्धतीने देता याव्यात म्हणून प्रयत्न व संशोधन करते. महाराष्ट्र शासनाच्या 'सी.बी.एस.ई' च्या धर्तीवर होणाऱ्या 'एमएच-सेट' व 'जेईई' या परीक्षांचे आयोजन कले जाते. यावर्षी ५ जानेवारी २०१४ 'सेट' व 'जेईई' यशस्वी आयोजन केले होते. यामध्ये आपल्या महाविद्यालयाचे १०५ विद्यार्थ्यांनी ही सराव परीक्षा दिली. यानंतर ३० मार्च २०१४ रोजी पुन्हा एकदा अशा प्रकारची परीक्षा होणार आहे. 'डीपर' तर्फे ई ११ वी साठी 'आरंभ-१४' या परीक्षेचे आयोजन ३० मार्च २०१४ रोजी केलेले आहे. आपल्या महाविद्यालयातील १३० विद्यार्थी सदर परीक्षा देणार आहेत. 'डीपर' परीक्षा दिल्यामुळे विद्यार्थी अंतिम परीक्षा तणावमुक्त पद्धतीने देतो, सराव झाल्यामुळे इतर अडचणी येत नाही. निकाल लागल्यानंतर त्याचे योग्य ते पृथःकरण केले जाते.

'सेट' विभागामार्फत सर्व परीक्षांची माहिती वेळोवेळी दिली जाते व सर्व 'ऑनलाईन' प्रक्रिया मोफत महाविद्यालयामध्ये राबविली जाते. निकाल लागल्यानंतरची प्रवेश मिळेपर्यंत सर्व माहिती प्रा. विवेक वाकचौरे देत असतात. यावर्षी देखील महाविद्यालयामध्ये 'सेट' कोर्सचे आयोजन करण्यात आले आहे. एकूण १८ विद्यार्थी नियमित मार्गदर्शन वर्गाचा लाभ घेत आहेत. बोर्ड परीक्षा संपल्यानंतर पूर्ण वेळ मार्गदर्शन वर्गाचे आयोजन केलेले आहे.

वरील सर्व उपक्रमांमध्ये प्रा.गोर्डे, प्रा.लांडगे, प्रा. कर्पे, प्रा.उगले, प्रा. डावखर, प्रा.शिंदे, प्रा.बिबवे, प्रा.जाधव, प्रा.कोरडे, प्रा.मनिषा घोलप, प्रा.अंजली नवले, प्रा.देशमुख यांचे मोलाचे सहकार्य मिळाले.

## विज्ञान मंडळ

**अध्यक्ष : प्रा. महेश उगले**

मंडळाच्या वतीने निबंध लेखन, विज्ञान बुद्धीमत्ता चाचणी स्पर्धा घेण्यात आल्या. विज्ञान विषयक लेखांचे वाचन, भित्तीपत्रके प्रदर्शन हे उपक्रम घेण्यात आले. विविध स्पर्धांतील बक्षिसप्राप्त विद्यार्थी पुढील प्रमाणे. - १) आदित्य टांकवाल, २) शितल सावंत, ३) श्रद्धा भांगरे, ४) अर्चना आढाव, ५) शुभम वाडगे, ६) रोहम वाकळे, ७) प्रणव पवार, ८) प्रमिला मुठे

सदस्य - प्रा.डॉ.एस.डी.शिंदे व प्रा. भूषण जाधव यांचे विशेष मार्गदर्शन सहकार्य लाभले.

## नियतकालिक विभाग

**प्रा.डॉ. सुनील शिंदे**

नियतकालिक विभागाचे कार्य साहित्य संकलनासह प्रगतीपथावर आहे. प्रा.जी.डी. लांडगे, प्रा. रोहिणी डावरे यांचे मोलाचे सहकार्य, मार्गदर्शन लाभले.

## ग्राहक भांडार

**अध्यक्ष : प्रा. बी.पी. शेटे**

